परस्परं भावयन्तः

म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ३७ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च १९९९

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

**(फक्त खाजगी वितरणासाठी)**

## अध्यक्षांचे आवाहन

**(पुण्यातील वर्धापन-दिन प्रसंगीचे सुरेशभाऊंचे भाषण:२६.१.९९)**

सभासद बंधू-भगिनींनो,

सोळा वर्षांचे अनुभव जमेला धरून, आपणापाशी काही गोष्टी सांगाव्या या हेतूने मी अध्यक्ष या नात्याने आपणाला खालील आवाहन करीत आहे.

मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेमध्ये कुलवृत्तांत अद्ययावत स्वरूपात प्रसिद्ध करणे हा प्रमुख हेतु होता. आपणा सर्वांच्या आशीर्वादाने व सहकार्यामुळे हा प्रचंड प्रकल्प यशस्वीरीत्या पार पडला. कुलवृत्तांताचे काम करताना हे काम पुरे झाल्यानंतर प्रतिष्ठानपुढे कार्याभावी पोकळी निर्माण होऊ नये म्हणून व कुलवृत्तांताच्या कामानिमित्त एकत्र झालेले कुलबांधव त्यांच्यामध्ये निर्माण झालेली सामाजिक कार्याची जाणीव व सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपसांत रुजलेला व वाढलेला ऋणानुबंध असाच कायम रहावा म्हणून कुलबांधवांच्या हिताची काही कामे हाती घेण्याचा संकल्प सोडण्यात आला. त्यासाठी **शिक्षणनिधीसारखा स्वतंत्र निधी उभारला गेला**. आपले एक ज्येष्ठ कुलबंधू कै. श्रीपाद चिं. मराठे यांनी **वैद्यकीय मदतीसाठी भरघोस देणगी** दिली आणि या कार्याला आणखी एक मिती प्राप्त झाली.

शिक्षण आणि आरोग्य यांच्याइतकीच किंबहुना जास्त महत्वाची गोष्ट उदरनिर्वाह. आपल्या ब्राह्मण समाजातील तरुणांनी नोकरीच्या मृगजळापाठी व्यर्थ न धावता उद्योग क्षेत्रात शिरावे म्हणून **उद्योग प्रेरणा हा नवीन उपक्रम हाती घेतला** आहे. त्याची माहिती प्रसंगानुरूप हितगुजमध्ये येतेच. प्रतिष्ठानच्या प्रत्येक समारंभात मी त्याचा आवर्जून उल्लेख करतो.

प्रतिष्ठानचा जगन्नाथाचा रथ पुढे नेण्यासाठी अहमअहमिकेने पुढे येऊन हिरिरीने व नेटाने काम करण्यासाठी स्वयंसेवक तरुण, प्रौढ, स्त्री-पुरुष सर्वांचा प्रतिसाद अपेक्षेइतका मिळत नाही. त्यामुळे काही वेळा मन व्याकुळ होते. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' म्हणतात हे तर खरेच. म्हणूनच आपले कार्य गेली १६ वर्षे सतत प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे. पण आता **एकविसाव्या शतकात मोठी झेप घेण्यासाठी अधिक महत्वाकांक्षी कार्यक्रम घेऊन 'परस्परं भावयंत:' हे आपले ब्रीदवाक्य सार्थ करण्यासाठी ठोस कृती करण्यासाठी कार्यकर्ते कमी पडले असे होऊ नये.** कार्यकर्त्यांची फौज निर्माण करून जास्तीत जास्त लोकाभिमुख व विशेषकरून तरुणांना हितकारक व उद्योगप्रवण बनविणारे कार्यक्रम सुरू करणे नितांत आवश्यक आहे.

याची पूर्वतयारी म्हणून मुंबई कार्यालयाने आता सर्व विभागांना जिल्हानिहाय पत्त्यांसह सर्व मराठे परिवारीयांची यादी उपलब्ध करून द्यावयास सुरवात केली आहे.

**नागपूरकरांचे या संदर्भात अभिनंदन करावयास हवे**. त्यांनी ६ महिन्याच्या अवधीत फक्त नागपूर शहरांतील ४४ कुटुंबियांशी प्रत्यक्ष संपर्क साधून ४ मेळावे यशस्वी केले. इतकेच नव्हे तर आपण पुरविलेल्या माहितीत भर टाकून मराठ्यांची नागपूर डिरेक्टरी अद्ययावत करण्यात येत आहे. अगदी थोड्या सूचनेवर सुद्धा तेथील कुटुंबीय एकमेकांशी संपर्क साधून एकत्र येऊ शकतात. **एकत्र येण्यामागे प्रचंड शक्ती आहे. तिला वळण देऊन कित्येक कार्यक्रम करता येतील.**

**मुंबईला सुद्धा असाच विभागीय मेळावा मुख्यत: परस्पर परिचय व विचारांची देवाण-घेवाण या स्वरूपात १३ फेब्रुवारीला बोरीवली**

पृष्ठ २ वर

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

### कार्यकारी मंडळ सभा

दर महिन्याच्या दुसऱ्या व गरजेप्रमाणे चौथ्या शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा असते. त्यावेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठानच्या कार्यालयात येऊ शकतो.

मागील तिमाहीत डिसेंबर १२, जानेवारी ९, आणि फेब्रुवारी १३ व २७ रोजी कार्यकारी मंडळाच्या एकूण ४ सभा झाल्या.

### वैद्यकीय व्याख्याने ९.१.९९

प्रतिष्ठानच्या वैद्यकीय समितीच्या विद्यमाने प्रतिष्ठानच्या कार्यालयात ९.१.१९९९ रोजी खालील दोन डॉक्टरांची व्याख्याने झाली.

१) **डॉ. चंद्रकांत वि. पटेल**, जी.एस्.मेडिकल कॉलेजमधील सर्जरीचे प्राध्यापक
**विषय - कर्करोग आणि आपण**

२) **डॉ. शरद दत्तात्रय** (पृ.४१७) संमोहन - बधिरीकरण तज्ञ
**विषय - ॲनेस्थेशिया - समज व अपसमज**

दोन्ही व्याख्याने अतिशय रंजक व माहितीपूर्ण झाली. व्याख्यानांचा वृत्तांत या अंकात स्वतंत्ररीत्या छापला आहे.

### संक्रांत मेळावा, नागपूर १०.१.९९

दि. १०.१.१९९९ रोजी मकरसंक्रांतीला नागपूरमधील कुलबांधवांचा मेळावा झाला. गेल्या सहा महिन्यांतले नागपूरकरांचे हे चौथे संमेलन. दर २-३ महिन्यांनी एक संमेलन होत असल्यामुळे नागपूरमधील कुलबांधवांमध्ये सततचा संपर्क निर्माण होऊन एकमेकांच्या ओळखीदेखी वृद्धिंगत व्हायला मदत होत आहे. या संक्रांत संमेलनाचा वृत्तांत याच अंकात छापला आहे.

### वर्धापन दिन २६.१.९९

सालाबादप्रमाणे २६ जानेवारीला पुणे शाखेतर्फे प्रतिष्ठानचा २०वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. प्रतिष्ठानच्या वतीने कोषाध्यक्ष सीताराम गोपाळ खांबेटे उपस्थित होते. वर्धापन दिन समारंभाचा वृत्तांत या अंकात छापला आहे.

### विभागी मेळावा, बोरिवली - १३.२.१९९९

बृहन्मुंबईतील मालाड ते भाईंदर या पश्चिम उपनगरांतील कुलबांधवांचा मेळावा दि. १३.२.१९९९ रोजी बोरिवली येथे घेण्यात आला. सुमारे ७५ कुलबांधव यावेळी उपस्थित होते. परस्पर परिचय व प्रतिष्ठानच्या कार्याबाबत चर्चा झाली. असे मेळावे वारंवार व्हावे म्हणजे कुलबांधवांमध्ये प्रत्यक्ष संपर्क वाढायला, सातत्य टिकायला मदत होईल अशी सार्वत्रिक भावना दिसून आली. मेळाव्याचा वृत्तांत याच अंकात स्वतंत्रपणे छापला आहे.

### विशेष देणग्या

१) मुंबईतील रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूटच्या संवर्धक - संचालिका **शालिनीबाई धुंडिराज** (पृ.१३४) **यांनी प्रतिष्ठानला रु. १०,००० देणगी** म्हणून दिली असून या रकमेच्या व्याजाची रक्कम वैदिक ऋचांचे पठण करणारा विद्यार्थी अथवा हिंदुधर्माच्या प्रचारार्थ आयुष्य वेचायचे असे ठरवून कार्य करणारी व्यक्ति यांना दरवर्षी द्यावयाची आहे. मराठे घराण्यातली अशी व्यक्ति न मिळाल्यास इतर ब्राह्मण कुटुंबातल्या व्यक्तीला ही रक्कम द्यावयाची आहे.

शालिनीबाईंच्या या देकाराबद्दल कार्यकारी मंडळाच्या २७.२.९९च्या सभेत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

२) जकार्ता येथील कुलबांधव **अनिल गणेश** (पृ.११५), **यांनी शिक्षण निधीसाठी रु. ५०००** देणगी दिली आहे. देणगी मिळवून दिल्याबद्दल प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष 'ग.वि.' यांच्या पत्नीचे मालिनीबाईंचे आभार.

---

**अध्यक्षांचे आवाहन** - पृष्ठ १ वरून

**येथे घेण्याचे निश्चित झाले आहे.** *(याचा वृत्तांत याच अंकात स्वतंत्रपणे दिला आहे. - संपादक.)* असे उपक्रम परस्परांना समजून घेण्यासाठी उपयोगी ठरावे. यातूनच परस्पर सहाय्याच्या विचारांना चालना मिळू शकते.

**सभासद नोंदणीसाठी** सभासद न झालेल्या कुलबांधवांकडे जाऊन त्यांना प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती देऊन सभासद करण्यासाठी **कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे.** हे काम फुरसतीच्या वेळी करता येईल. यासाठी लागणारी पूरक माहिती देण्याची व्यवस्था केली जाईल. या ठिकाणी काही आकडेवारी उद्बोधक ठरावी. एकूण परिवारीय संख्या २२०० पैकी मुंबई, पुणे, ठाणे, महाराष्ट्र, अन्य विभाग मिळून फक्त ७६० हितगुज सदस्य आहेत. **म्हणजेच २/३ कार्य अजून शिल्लक आहे.**

**वधू-वर मंडळ हे अत्यंत उपयोगी कार्यक्षेत्र** आहे. एखाद्या तरुणीचे वा तरुणाचे लग्न जमविण्यात ज्याचा सहभाग असेल त्याला खरोखरच त्या तरुणीचे व तरुणाचे भवितव्य घडविण्याचे निदान अंशतः श्रेय प्राप्त होईल. **पुणे येथे हे कार्य सौ. नीलांबरी मराठे निरलसपणे करीत आहेत.** मुंबईमध्ये अजून योग्य ती व्यवस्था होऊ शकली नाही. पण प्रयत्न चालू आहेत.

भाषण संपण्यापूर्वी मी आपणाला आग्रहपूर्वक आवाहन करतो की, **आपण प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रीय मदत करण्यासाठी पुढे या.** आपण किती, कोणत्या स्वरूपाची मदत करू शकाल ते आम्हाला लेखी स्वरूपात वा प्रत्यक्ष भेटीत जरूर कळवावे. आपण देऊ केलेल्या प्रत्येक क्षणाचा प्रतिष्ठान योग्य तो उपयोग करील याबद्दल आपण खात्री बाळगा. अखेर प्राप्त परिस्थितीत आपल्यालाच आपला विकास घडवून आणणे प्राप्त आहे आणि सर्वांच्या सहकार्याने ती गोष्ट प्रयत्नसाध्य आहे यावर माझा विश्वास आहे.

***

---

एकमेकां साह्य करू

### इन्कमटॅक्स रिटर्नबाबत सहाय्य

प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद गजानन चिंतामण** (पृ.१२९) हे गेली ३० वर्षे इन्कमटॅक्स मध्ये काम करतात. कुलबांधवांना टॅक्स रिटर्न भरण्याबाबत, तसेच स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या क्लार्क व इन्स्पेक्टरच्या परीक्षेबाबत मार्गदर्शन करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे.

**त्यांचा पत्ता** : सार्थक, ३४ अ, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३० (फोन - ५३९०७६).

Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

### माणिक वर्मा स्मृती पुरस्कार



पुणे येथील स्वरानंद प्रतिष्ठानतर्फे यदापासून सुरू करण्यात आलेला माणिक वर्मा स्मृती पुरस्कार **ज्येष्ठ गायिका अनुराधा मराठे** (पृ.२०७) यांना जाहीर झाला आहे. संगीताच्या क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटविणाऱ्या गायिकेला २००१ रुपये व स्मृतिचिन्ह असा हा पुरस्कार दरवर्षी देण्यात यायचा आहे. १७.२.१९९९ रोजी ख्यातनाम गायक पं. भीमसेन जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

### अशोक मनोहर यांना शिक्षक पुरस्कार



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतील शिक्षकांसाठी देण्यात येणारा राज्य पुरस्कार **१९९७-९८ साठी अशोक मनोहर** (पृ.३९२) यांना शिक्षक दिनी ५ सप्टेंबर १९९८ रोजी प्रदान करण्यात आला.

### पुष्कर सतीश - दूरदर्शनवर

प्रतिष्ठानचे **दादर, मुंबईतील सभासद सतीश काशिनाथ** (पृ.१२९) **यांचा मुलगा पुष्कर** हा दूरदर्शनच्या 'कोवळी मने' या मालिकेत काम करीत आहे. अवघ्या १० वर्षांच्या या बालकलाकाराला सर्व कुलबांधवांच्या सदिच्छा!

### अभाविपचे प्रांताध्यक्ष मिलिंद सुधाकर

**ठाणे येथील कुलबांधव मिलिंद सुधाकर** (पृ.१२९) यांची अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे महाराष्ट्राचे प्रांताध्यक्ष म्हणून नेमणूक झाली असून त्यांनी १.९.१९९८ पासून ही नवीन जबाबदारी स्वीकारली आहे. यापूर्वी त्यांनी दोन वर्षे अ.भा.वि.प. चा पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे.

### पं. डॉ. सुधाकर जनार्दन यांचे श्री गंधर्व महाविद्यालय, वारजे, पुणे २९.



**कै. जनार्दन सदाशिव व त्यांचे पुत्र डॉ. सुधाकर** (पृ.४५) यांनी गेली ६३ वर्षे पुण्यातील रास्ता पेठे मध्ये ? विद्यालय चालविले. आता पुण्याच्या अति-पश्चिम भागात एन् डी. ए. रोड व मुंबई बेंगलोर महामार्गावर बी. आय. ई. एफ कॉलेजशेजारी स्वतःची तीन मजली इमारत उभारून **डॉ. सुधाकर जनार्दन यांनी नवीन वास्तूमध्ये नवीन संस्थेची मुहूर्तमेढ रोवली**. या संस्थेची सर्व जबाबदारी सर्वात धाकटे चिरंजीव धनंजय यांचेवर सोपविली. पहिल्याच दिवशी सात विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली.

विद्यालयाचे उद्घाटन २५.२.१९९८ रोजी जागतिक किर्तीचे सरोदवादक उस्ताद खांसाहेब अब्दुल हलीम जाफरखाँ यांचे शुभहस्ते झाले. या कार्यक्रमाला पुण्यातील संगीत क्षेत्रातील अनेक मातब्बर लोक हजर होते.

या कार्यक्रमाचे वेळी संस्थेचे चालक श्री. धनंजय सुधाकर, सं. अलंकार यांनी अल्हैय्या बिलावल् राग सादर केला. तसेच डॉ. सुधाकर यांनी राग मियाकी तोडी मध्ये बडाख्याल, छोटा ख्याल व तराणा सादर केला.

या संगीत विद्यालयात गायन वादन (तबला, सतार, व्हायोलिन, बासरी), नृत्य (कथ्थक, भरतनाट्यम्) शिकविले जाणार आहे. विद्यालयांत श्री. धनंजय सुधाकर सं. अलंकार, आई सौ. माधुरी जनार्दन सं. विशारद, आणि वडील डॉ. सुधाकर जनार्दन व शिवाय तबला, नृत्य, कथ्थक, भरतनाट्यम् साठी वेगळे शिक्षक येणार आहेत.

---

### सौ. गायत्री गणेश जोशी यांना आकाशवाणी निबंध स्पर्धा पारितोषिक

प्रतिष्ठानची माहेरवाशीण सभासद सौ. गायत्री गणेश जोशी (पृ.६७६), प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे यांची बहीण, हिला महाराष्ट्र राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष आणि मुंबई आकाशवाणी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या १९९७-९८ च्या निबंध स्पर्धेत रु. ३०० चे तृतीय पारितोषिक मिळाले. या निबंधाचे आकाशवाणीवरून प्रसारण झाले. आकाशवाणीवरून विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी सादर करण्यात येणाऱ्या बऱ्याच कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो.

### तडाखेबाज फलंदाज मेघना उमेश

प्रतिष्ठानचे गिरगाव, मुंबईतील सभासद **उमेश धुंडीराज** (पृ.१३४) **यांची ९वीत शिकणारी १३ वर्षांची मेघना धडाकेबाज फलंदाज** म्हणून पुढे येत आहे. महाराष्ट्र स्टेट स्पोर्टस् असोसिएशनतर्फे मनोरमाबाई आपटे ट्रॉफीसाठी झालेल्या आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत सेंट कोलंबा स्कूल तर्फे खेळताना माऊंट मेरी शाळेबरोबरच्या २५ षटकांच्या सामन्यात डावाची सुरवात करताना मेघनाने फक्त ८० चेंडूत नाबाद ८३ धावा (१४ चौकार) काढून शाळेला विजय मिळवून दिला.

सचिन तेंडुलकर हा तिचा आदर्श असल्याचे ती सांगते. या सामन्यात तिने सचिनप्रमाणेच चौकारांची आतषबाजी करून जणू त्याच्या पावलावर पाऊल टाकून क्रिकेटची वाटचाल सुरू केली आहे. सचिन बॅटिंगबरोबर बोलिंगही करतो, तर मेघना करते विकेटकिपींग.

### जयंत श्रीधर विद्वांसांचे विनामूल्य अभ्यासवर्ग

प्रतिष्ठानचे **बोरिवली (प.) चे सभासद जयंत श्रीधर विद्वांस** (पृ.६४८) हे गेली सात वर्षे योगानंद सहनिवासात संस्कार केंद्र व इंग्रजी, गणित व सामान्य विज्ञान या विषयांचे अभ्यासवर्ग विनामूल्य चालवीत आहेत. १.५.९७ पासून कोफराड व्हिलेज, विरार (प.) येथेही त्यांनी वर्ग सुरू केले आहेत.

Marathe Pratishthan

## निशाची रंगपूजा



प्रतिष्ठानचे अमेरिकेतील **आश्रयदाते वर्गामधले सभासद माधव विनायक** (पृ.६९) **यांची कन्या कु. निशा** हिने 'कुचिपुडी' नृत्यशैलीमधील आपल्या नृत्यशिक्षणाचा सात वर्षांचा टप्पा नुकताच पूर्ण केला. त्या निमित्ताने 'रंगपूजा' या वैयक्तिक नृत्याचा तिचा कार्यक्रम स्थानिक नाट्यगृहात साजरा झाला.

तीन तासांच्या या कार्यक्रमामध्ये निशाने आकर्षक पदन्यास, अनुरूप हावभाव आणि डौलदार, मोहक व आवेशपूर्ण हालचाली यांमुळे प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. कार्यक्रम बहारदार झाला. शालेय शिक्षणाव्यतिरिक्त ती राज्य स्तरावरील वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घेत असते. कंप्यूटर व इतर विज्ञान विषयांची तिला विशेष आवड आहे. प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

---

## कुर्यात् बटोर्मंगलम्

१) पुण्यातील कुलबांधव **श्रीधर कृष्णाजी यांचा मुलगा संकेत, आणि त्याचे दोन चुलतभाऊ स्वप्निल सुरेश व वरुण वसंत** (सर्व पृ.४१) यांचे व्रतबंध ४ जून १९९८ रोजी पुण्यात संपन्न झाले.

२) वेंगुर्ले जि. रत्नागिरी येथील कुलबांधव **दत्तात्रय यशवंत** (पृ.५११) **यांचे पुतण्ये महेश माधव आणि ॐकार सुरेश** यांचा उपनयन संस्कार २८.१.१९९९ रोजी झाला.

**मराठे प्रतिष्ठानतर्फे सर्व बटूंस शुभाशीर्वाद.**

## नांदा सौख्यभरे

१) बोरिवली, मुंबई येथील सभासद **जयंत श्रीधर विद्वांस यांचा मुलगा नितीन** (पृ.६४८) याचा विवाह नरहर जोशी यांची ज्येष्ठ कन्या पूजा हिच्याशी १९.५.९८ रोजी शिवाजी पार्क मुंबई येथे संपन्न झाला.

२) कॉटनग्रीन, मुंबई येथील कुलबांधव **कै. दत्तात्रय रामचंद्र यांचा ज्येष्ठ पुत्र उपेंद्र** (पृ.२२३) याचा विवाह शरदचंद्र दिनकर सावरकर यांची मुलगी शितल हिच्याशी ८ नोव्हेंबर १९९८ रोजी दादर, मुंबई येथे संपन्न झाला.

३) पुण्यांतील सभासद **कमलाकर अनंत जाईल याचे कनिष्ठ सुपुत्र अजित** (पृ.७५७) आणि अरविंद प्रभाकर मोघे यांची सुकन्या पल्लवी यांचा शुभविवाह पुण्यांत १३.१२.१९९८ रोजी झाला.

४) दादर, मुंबई येथील प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष **गणेश विनायक यांची नात चेतना श्रीहरी** (पृ.११५) हिचा विवाह अनूप गव्हाणकर यांचेशी २७ डिसेंबर १९९८ रोजी मुंबईत थाटामाटाने साजरा झाला.

५) प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य व पूर्वविश्वस्त **मोहन सदाशिव** (पृ.३६५) **यांची कनिष्ठ कन्या मीनल** हिचा शुभविवाह अरुणकुमार गुप्ता यांचा ज्येष्ठ सुपुत्र अमित याचेशी मीरत येथे ६ फेब्रुवारी १९९९ रोजी थाटामाटात साजरा झाला.

६) वसई, जि. ठाणे येथील कुलबांधव **अविनाश मोरेश्वर यांची द्वितीय कन्या अश्विनी** (पृ.१९०) हिचा शुभविवाह दिवाकर शंकर गोखले यांचा ज्येष्ठ पुत्र मिलिंद याचेशी ९ फेब्रुवारी १९९९ रोजी ठाणे येथे संपन्न झाला.

७) अहमदाबाद येथील सभासद **गणेश काशिनाथ यांचा पुत्र सचिन** (पृ.५३४) याचा शुभविवाह नारायणराव आगाशे यांची कन्या प्रीती हिच्याशी अहमदाबाद येथे ६ मार्च १९९९ रोजी धूमधडाक्यात पार पडला.

**सर्व नवविवाहित वधूवरांस**
**मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा.**

## सहवेदना

१) प्रतिष्ठानचे सदस्य गोविंद मधुकर यांचे वडील **मधुकर दत्तात्रय** (पृ.३१६) यांचे ८ सप्टेंबर १९९६ रोजी ६५व्या वर्षी निधन झाले.

२) पिंपरी, पुणे येथील सभासद विजय वासुदेव यांचे वडील **वासुदेव गोपाळ** यांचे ११ डिसेंबर १९९७ रोजी कैमोर (मध्य प्रदेश) येथे निधन झाले.

३) नागपूरमधील सभासद **प्रभाकर शंकर** (पृ.१०१) यांचे ६ सप्टेंबर १९९८ रोजी नागपूर येथे अकस्मात निधन झाले. यांच्या पत्नीचा परिचय कर्तृत्ववान, संस्कारशील, कर्तव्यदक्ष माता म्हणून हितगुज, मार्च १९९८ अंकात दिला होता.

४) नागपूरमधील सभासद **सुहास मधुकर यांची आई मालतीबाई** (पृ.१५४) यांचे २९.१०.१९९८ रोजी दुःखद निधन झाले.

५) विलेपार्ले, मुंबई येथील कुलबांधव **पांडुरंग मोरेश्वर उर्फ बाळा खांबेटे** (पृ.६९९) यांस ३.११.१९९८ रोजी देवाज्ञा झाली.

६) **माटुंगा, मुंबई येथील सभासद जयंत पुरंदर** (पृ.१८०) यांचे ३.१२.१९९८ रोजी जळगाव येथे रेल्वे अपघातात निधन झाले. यांचे आजोबा पुण्यातील ग. स. उर्फ ॲक्चुअरी मराठे हे १९४६ साली प्रसिद्ध झालेल्या मराठे कुलवृत्तांताच्या १ल्या अवृत्तीचे १ले देणगीदार (रु. १०००) होते.

७) **डोंबिवली, जि. ठाणे येथील कुलबांधव नारायण भिकाजी** (पृ.४०१) यांचे २३.११.१९९८ रोजी दुःखद निधन झाले. यांना किडनी ट्रान्स्फर शस्त्रक्रियेसाठी रु.२०,००० वैद्यकीय मदत दिल्याचे हितगुज डिसेंबर १९९८ अंकात वाचले असेलच. या ऑपरेशननंतर २/३ दिवसातच ते निवर्तले.

**वरील सर्व कुटुंबीयांच्या दुःखात**
**मराठे परिवार सहभागी आहे.**



Marathe Pratishthan

# डॉक्टरांशी हितगुज-कर्करोग आणि ॲनेस्थेशिया बाबत

- **विनायक केशव (पृ.२०)**, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

मराठे प्रतिष्ठानच्या गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रतिष्ठानच्या कार्याला गती प्राप्त व्हावी या उद्देशाने निरनिराळया समित्या स्थापन करण्यात आल्या. वैद्यकीय समितीचे निमंत्रक डॉ. शरद मराठे (पृ.४१७) यांनी निरनिराळ्या वैद्यकीय क्षेत्रात मान्यता प्राप्त झालेल्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्याचे ठरविले. त्यानुसार दि. ९.१.१९९९ रोजी संध्याकाळी ५ वाजता मराठे उद्योग भवन येथे डॉ. चंद्रकांत पटेल आणि डॉ. शरद मराठे या डॉक्टरद्वयांची व्याख्याने झाली.

**डॉ. चंद्रकांत पटेल** यांनी नोकरीच्या निमित्ताने मुंबईच्या के.ई.एम्. रुग्णालयात बरीच वर्षे वैद्यकीय सेवा व संशोधन केले आहे. कर्करोग हा त्यांचा खास संशोधनाचा विषय. त्यांनी त्यासाठी अतोनात कष्ट केले आहेत. त्यासाठी परदेशी दौरे केले आहेत. अनेक देशी परदेशी डॉक्टरांशी चर्चा केली. ते स्वतः ॲलोपथिक शाखेचे डॉक्टर असले तरी त्यांनी या संशोधनात विविध शाखांच्या उपचार पद्धतींचा सखोल अभ्यास व त्या शाखांतील तज्ञांशी विचारविनिमय केला आहे. **व्याख्यानाचा विषय कर्करोग हाच होता.**

आपल्या व्याख्यानात डॉ. चंद्रकांत पटेल यांनी पुढील गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला.

कॅन्सर वा कर्करोग या विषयावर ज्ञात माहितीच्या आधारे किमान दोनशे वर्षे संशोधन चालू आहे. तरीसुद्धा आपल्याला अवगत झालेले ज्ञान म्हणजे हिमनगाचे निमुळते टोक आहे. खेकड्याच्या तावडीतून माणूस सहसा सुटत नाही. म्हणूनच या रोगाला खेकड्याचे नाव 'कर्क' दिले असावे. या रोगाचे अनेक प्रकार आहेत. मती गुंग करून टाकणाऱ्या वेगांनी व रुपांनी हा रोग रुग्णाला यातना देत मृत्यूच्या स्वाधीन करतो.

या रोगाचे एका वाक्यात वर्णन करायचे तर असे म्हणता येईल की हा रोग म्हणजे नैसर्गिक नियम न पाळणाऱ्या पेशींचा समूह. या वाढीचे प्रकार आहेत वाढत्या पेशींचा कर्करोग, जीर्ण पेशींचा कर्करोग वगैरे. या अनिर्बंध पेशी दुसऱ्या पेशींना वाढू देत नाहीत यातच या रोगाचे वैशिष्ट्य.

बरेच जण असा दावा करतात की आयुर्वेदात या रोगावर रामबाण उपाय आहे. मी स्वतः बरेच संस्कृत जुने ग्रंथ वाचले आहेत. मला गुल्म हा एकच काहीसा समानार्थी शब्द सापडला. उलट अशा तऱ्हेच्या रोगाचे निदान झाले तर वैद्यांनी हार मानून पाठ फिरवावी असाच सल्ला त्यांना दिला आहे.

मी स्वतः पुष्कळ मित्रांना या बाबतीत रुग्णालयात संधी दिल्या आहेत. पण समाधानकारक उपाययोजना कुणीही सुचवू शकत नाही.

सतत घर्षण हे अनेक कारणांपैकी एक कारण आहे. उदा. दाताचे टोक गालात बराच काळ घासत राहिले तर कर्करोग होऊ शकतो. अंतःस्राव नैसर्गिक नसेल तर हा रोग होऊ शकतो. नैसर्गिक कार्यात अडथळे हे एक प्रमुख कारण आहे. हार्मोन्सची अनैसर्गिक वाढ हे सुद्धा एक कारण होऊ शकते.

वाढणारा अल्सर, गाठी, आठवड्यानंतरसुद्धा न सुधारणारा आवाज, नखांना गोलाकार आकार (फुफ्फुसाचा कर्करोग), भूक अचानक मंदावणे, सारखे शौचाला होणे ही कर्करोगाची लक्षणे आहेत. प्रोस्टेट ग्रंथीचा त्रास होणाऱ्या रुग्णांपैकी ४० टक्के रुग्णांना कर्करोगाची बाधा असते.

जुनाट विकृतींकडे दुर्लक्ष केल्यास कर्करोगाची लागण होणे अगदी क्रमप्राप्त आहे.

निदानपद्धतींमध्ये पूर्वी क्ष किरणे वा बेरीयम तपासणीवर भर असे. आता सोनोग्राफी, कॅटस्कॅन, रक्तवाहिनीतील इंजेक्शन्स हे उपाय योजतात. पण हा सारा सावल्यांशी खेळ आहे. पेशींचा अभ्यास हा त्यातल्या त्यात काहीसा निदान करण्याचा चांगला प्रकार म्हणावा लागेल.

कर्करोगाच्या बाबतीत काही वेळा एकाच जागी वाढ होते. त्यावर रेडीएशनचा उपचार करतात. पसरत जाणाऱ्या कर्करोगावर शस्त्रक्रिया करतात. तर काही वेळा रक्ताचा कर्करोग होतो त्यावर केमोथेरपीचा उपचार करतात.

खरं म्हणजे अन्ननलिकेपासून गुदद्वारापर्यंतचा भाग म्हणजे नाना तऱ्हेच्या जंतूंचे माहेरघर आहे. पण जोपर्यंत रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असते तोपर्यंत या रोगजंतूंचे पर्यायानी रोगांचे प्राबल्य होत नाही. कर्करोगावर वॅक्सीन (Vaccine) तयार करण्याचे प्रयोग चालू आहेत. नाना तऱ्हेच्या

## वाचनीय

आपले प्रतिष्ठान तरुणांनी कारकुनी न करता स्वतःच्या व्यवसाय करावा असे सांगत आहे. यासाठी मार्गदर्शक ठरणारे एक नवीन पुस्तक नुकतेच वाचनात आले. पुस्तकाचे नाव **'भारतीय व्यवस्थापकांच्या अद्‌भुत दुनियेत (व्यवस्थापन कसं नसावं याचा आदर्श वस्तुपाठ)' लेखक**- शरू रांगणेकर (मूळ इंग्रजीत) **मराठी अनुवाद**-किशोर आरस **व्यंगचित्रे**-आर्.के. लक्ष्मण

पुस्तकाची भाषा, मांडणी व व्यंगचित्रांमुळे पुस्तक मोहून टाकते. त्यातील काही प्रकरणे -

१) प्रशिक्षण नावाची शोकांतिका
२) बढती नसलेल्या बढत्या
३) व्यवस्थापन आणि भाषण
४) आपला व्यवस्थापन गुरू आपली बायको

प्रेषक - **चिंतामणि त्र्यंबक** (पृ.२४८), कळवा, जि. ठाणे

***(या अंकापासून वाचनीय हे नवीन सदर सुरू होत आहे. वाचकांनी त्यांना आवडलेल्या वैचारिक तसेच ललित साहित्याची माहिती-(कथा, कादंबरी, काव्य, तसेच मासिकांतील लेख इ.) या दसरात प्रसिद्धीसाठी पाठवावी -संपादक)***



Marathe Pratishthan

पद्धतीचा उपयोग करून निदान कर्करोग फैलावण्याची क्रिया मंद करण्याचे प्रयोग चालू आहेत.

माझ्या मते रोग प्रतिकारक शक्ती वाढविणे हेच आपल्या हाती आहे. आहार, विहार आणि निद्रा यांचे संतुलन राखण्याने ती वाढविता येते.

शिवांबूचा प्रयोग बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाल्याचे सांगण्यात येते. पण निदान मला तरी याबाबतीत अधिकारवाणीने बोलता येत नाही.

त्यानंतर **डॉ. शरद मराठे यांनी 'बधीरीकरण-काही समज आणि अपसमज'** या विषयावर आपले विचार मांडले. डॉ. शरद मराठे हे बधीरीकरण शास्त्रातले एक ज्येष्ठ व जाणकार डॉक्टर आहेत. ते जवळ जवळ गेली ४० वर्षे वैद्यकीय क्षेत्रांत अनेस्थेशिया या विषयांत तज्ञ म्हणून काम करतात. मुंबईतील नामांकित हॉस्पिटल्स व उद्योगसमूहामध्ये काम करण्याचा त्यांना अनुभव आहे. वैद्यकीय क्षेत्रांतील त्यांच्या प्रदीर्घ व समृद्ध अनुभवामुळे त्यांचे नाव Biography International - 1993 : Men and Women of Achievement and Distinction ह्या जागतिक संदर्भ ग्रंथामध्ये पृ. ७७८ वर प्रविष्ट करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीमुळे त्यांचा अनेक विख्यात व्यक्तींशी, ज्यांत स्वा. सावरकरांसारख्याही व्यक्ती आहेत-जवळचा संबंध आला आहे.

डॉ. शरद मराठे यांनी आपले विचार खालीलप्रमाणे व्यक्त केले. - बधीरीकरण शास्त्राबाबत गैरसमजच जास्त आहेत. बऱ्याच जणांना या शास्त्राचे महत्वच जाणवत नाही. शस्त्रक्रियेच्या आधी रुग्णाला बेशुद्ध करणारा डॉक्टर एवढीच त्यांना माहिती असते. वास्तविक या डॉक्टरला सर्व तऱ्हेच्या शस्त्रक्रियांची सखोल माहिती असणे आवश्यक असते. एवढेच नव्हे तर शस्त्रक्रिया चालू असताना रुग्णाची तब्येत कशी आहे म्हणजेच रुग्ण शस्त्रक्रिया सहन करण्याच्या स्थितीत कितपत आहे, हे वेळोवेळी हा डॉक्टरच सांगू शकतो.

हा डॉक्टर अष्टावधानी असावा लागतो. एक डोळा शस्त्रक्रियेवर, एक डोळा बधीरीकरण यंत्रावर व मधून मधून (तिसरा डोळा नाही म्हणून) एक डोळा सर्व थिएटरभर फिरत ठेवावा लागतो. एका नाकपुडीने तो रसायनाचा शोध घेतो. दुसऱ्या नाकपुडीने तो शरीराच्या उघडलेल्या भागाचा वास घेतो. मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी कमीतकमी ५ जणांचे प्राण वाचवलेले असले पाहिजेत. त्याचे दोन्ही हात निरनिराळी कामे करीत असतात.

बधीरीकरणाचा प्रत्येक डोस थोडाफार विषारी असतो. बराच वेळ चालणारी शस्त्रक्रिया म्हणजे त्याची कसोटीच असते.

बऱ्याच वेळा या डॉक्टरला शस्त्रक्रियेच्या वेळी वातावरण सुखकारक ठेवण्याकरता चुटके, विनोद यांचा उपयोग करावा लागतो.

रुग्ण जर मधुमेह, हृदयरोग, रक्तदाब यांनी पीडित असेल तर शस्त्रक्रियेपूर्वी सखोल चौकशी करावी लागते. अशा रुग्णाच्या शस्त्रक्रियेच्या वेळी या डॉक्टरचे कसब पणाला लागते.

दोन्ही डॉक्टरांच्या भाषणानंतर श्रोत्यांनी त्यांना नाना प्रकारचे प्रश्न, शंका विचारल्या. डॉक्टरद्वयांनी त्यांचे पूर्ण समाधान केलेच पण त्यानिमित्ताने पूरक माहितीसुद्धा दिली.

विषय फारसे लोकप्रिय नसतानासुद्धा दोन्ही डॉक्टरांनी माहिती अगदी साध्या शब्दात, मधून मधून विनोदाची पेरणी करीत, श्रोत्यांपर्यंत पोहोचवली. **वैद्यकीय विषयांवर इतकी मनोरंजक चर्चा होऊ शकते हा सुखकारक अनुभव प्रत्येकाला आला.**

कार्यक्रम रंगला. वक्ते व श्रोते दोन्हीही अगदी आनंदी वातावरणात घरोघरी गेले. पण आमच्या मनात एक रुखरुख होतीच. एवढे अगत्याचे आमंत्रण देऊनसुद्धा अगदी मोजक्याच कुलबांधवांनी प्रतिसाद दिला.

या बाबतीत डॉक्टरद्वयांचे खरोखरच आभार मानणे आवश्यक आहे. श्रोते मोजकेच होते याबद्दल ते नाराज तर नाहीच झाले पण त्यांनी संयोजकांना उत्साहित केले.

माझी कुलबांधवांना एक कळकळीची विनंती आहे की त्यांनी पुढच्या अशा तऱ्हेच्या कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित रहावे. हे कार्यक्रम कंटाळवाणे अजिबात होत नाहीत. कारण श्रोत्यांची नाडी ओळखणं हा डॉक्टरांचा व्यवसायच आहे. ही सारी धडपड कोणाकरता करायची? आपल्याकरता ना? मग आपण उपस्थित राहणे आवश्यक नाही का?

## खुशीपत्रे

**(१)**

हितगुज डिसेंबर १९९८ चा अंक नेहमीप्रमाणे माहितीपूर्ण तर आहेच पण मनोरंजकदेखील आहे. छोटासा दिवाळी अंक वाचतोय असे वाटले. 'चकवा' ला एखाद्या लोकप्रिय मराठी मासिकांतही स्थान मिळाले असते. हितगुजमधले लेखन सफाईदार होऊ लागले आहे. यात संपादकांचा वाटा बराच असावा असा माझा होरा आहे. शुद्धलेखनात तर हितगुजला दहापैकी दहा मार्क!

आजकाल मी इंग्रजी व हिंदीतून सटरफटर लेखन करतो. छापूनही येऊ लागले आहे. माझ्यातल्या 'लेखका'चा शोध लागायला ७८ वर्षे लागली.

- **विनायक गोपाळ** (पृ.६९), अमेरिका.

**(२)**

डिसेंबर १९९८ चा हितगुजचा अंक वाचून, पाहून खूपच आनंद वाटला. एकंदरीत मराठे प्रतिष्ठानचा अंक हा दर्जेदार, वाचनीय व प्रशंसनीय आहेच.

- **भास्कर दत्तात्रेय** (पृ.२० - दत्तात्रेय विष्णु यांचे पुत्र) वाडा, जि. सिंधुदुर्ग

**(३)**

डिसेंबर १९९८ चा हितगुज चांगला आहे. श्रीपाद माधव यांची केवड्याचे कणीस ही कथा स्त्री-पुरुष समानतेच्या युगात स्त्रियांनी पौरोहित्य करण्यास हरकत नाही असेच सुचविते. पुण्याला ज्ञानप्रबोधिनीमार्फत आज स्त्रिया हे काम करीत आहेत. १०वा, १२वा दिवस का करायचा हे कुटुंबियांना समजावून सांगून हे विधी संस्थेच्या महिला करतात अशी माझी माहिती आहे.

- **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली.

Marathe Pratishthan

# दाद बोरिवलीची बोरिवली येथे १३ फेब्रुवारी १९९९ रोजी झालेल्या विभागीय मेळाव्याचा वृत्तांत

**- विनायक केशव (पृ.२०)**, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

मुंबईची लोकसंख्या बेसुमार वाढते आहे. मुंबई बेट असल्यामुळे उत्तर दक्षिणेलाच पाय पसरण्यास वाव आहे. दक्षिण मुंबई पुरेपूर भरली आहे. मुंबई शहराचे आक्रमण उत्तरेकडे सुरू आहे. उपनगरे, विस्तारित उपनगरे हे प्रदेश काबीज करून पूर्वी सत्ताधीश त्यांना मांडलिक राजे म्हणून शिल्लक ठेवीत तशी प्रक्रिया सुरू आहे. नवी मुंबई हा महामुंबईचा नवा उपग्रह आकार घेत आहे.

या परिस्थितीत आपली माणसं शोधणं आणि शोधल्यानंतर त्यांच्याशी सतत संपर्क ठेवणं हे अतिशय कठीण काम आहे. विकेंद्रीकरण हा एक उपाय सुचविला जातो. आपल्या प्रतिष्ठानने या सर्व गोष्टींचा विचार करून अधिवेशनांच्या जोडीला विभागीय मेळावे आयोजित करण्याचे ठरविले. डोंबिवली, पुणे, पुरळ इत्यादी ठिकाणी असे मेळावे भरविण्यात आले. नुकतेच नागपूरकर बांधवांनी एक मेळावा यशस्वीरीत्या भरविला होता. (पहा हितगुज डिसेंबर १९९८).

मालाड ते पालघर या परिसरातील बांधवांकरिता अशा तऱ्हेचा विभागीय मेळावा शनिवार दि. १३ फेब्रुवारी १९९९ रोजी बोरीवली (प.) येथे आयोजित करण्यात आला. सुमारे ७० कुलबांधवांची उपस्थिती हा प्रतिसाद खूपच उत्साहवर्धक होता. विशेष म्हणजे भगिनींनी कौतुकास्पद प्रतिसाद दिला. मुद्दाम उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपले कुलबंधू मा. माधवराव मराठे, विधानसभा सदस्य आवर्जून उपस्थित होते.

श्री. वि. के. मराठे, कार्यवाह यांनी उपस्थितांचे प्रतिष्ठानतर्फे मनःपूर्वक स्वागत केले आणि उपस्थितांनी मोकळेपणी चर्चा करावी, अडचणी सांगाव्या, सूचना कराव्या अशी विनंती केली.

अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी मेळाव्याची पार्श्वभूमी विशद करून असे मेळावे परस्पर परिचयाच्या दृष्टीने फारच उपयुक्त ठरतात हा प्रतिष्ठानचा अनुभव मुद्दाम नमूद केला. आज जवळ-जवळ १९ वर्षे कार्य केल्यानंतर मराठे प्रतिष्ठानला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. आपल्या प्रतिष्ठानकडून काय अपेक्षा आहेत व आपण प्रतिष्ठानसाठी काय करू शकता हे आपण अगदी मोकळेपणाने सांगावे अशी विनंती करताना




अध्यक्षमहाशयांनी पुढे अशी नम्र सूचना केली की प्रत्येकाने अंतर्मुख होऊन सूचना अंमलात आणण्यासाठी मी प्रतिष्ठानसाठी काय करू शकतो याचाही उल्लेख करावा. अध्यक्ष महाशयांनी आपले प्रास्तविक भाषण संपविताना असे आश्वासनपूर्वक सांगितले की विचार जागृती झाली व कार्याची दिशा निश्चित झाली की कार्यकर्त्यांची कमतरता भासणार नाही.

त्यानंतर परस्पर परिचयाचा कार्यक्रम झाला. प्रत्येक व्यक्तीचे नाव व विचार विस्तारभयामुळे देता येत नाहीत. जवळ जवळ सर्वच व्यक्तींनी परिचय देताना प्रतिष्ठानबद्दल आपुलकी व्यक्त केलीच पण एखाद दुसरा विचार, प्रतिक्रियाही व्यक्त केली.

उपस्थितांपैकी **आठ व्यक्ती संगीत क्षेत्रात** निपुण असल्याचे आढळून आले. **जाहिरात क्षेत्रात** नाव कमविलेल्या **दोन व्यक्ती** आढळून आल्या. **संस्कार केंद्र** चालविणारे बांधव होते. **ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणारे** कार्यकर्ते होते. **सौ. सुमती मराठे** (गोविंद नगर) या माननीय पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या प्रेरणेने काम करतात. तर **गुरुनाथ मराठे यांनी पत्रकारिता हा** पेशा स्वीकारला आहे. **श्री. दिलीप मराठे** (पृ.५०) हे **स्वत: सत्र न्यायाधीशाचे पद भूषवीत असताना संगीताची साधना सुद्धा** करतात. **सौ. मंगल मराठे** (मेघना सोसायटी) यांचे **Occupational Therapy** हे सेवाक्षेत्र आहे. **नरहरी गो. मराठे हे भारतीय मजदूर संघाचे क्रियाशील कार्यकर्ते** आहेत. **प्रमोद मराठे मुंबई महापालिकेत उच्च यांत्रिकी अधिकारी** असून संगीताची आवड जोपासतात. **त्यांच्या पत्नी श्रुती विमा योजनेत नोकरी करताना समाजकार्य** करतात. त्यांनी मराठे कुलबांधवांच्या **रक्तगटांची सूची करावी** अशी एक विधायक सूचना मांडली. **संजय भा. मराठे** (पृ.३६) **यांनी प्रतिष्ठानने गृहनिर्माण प्रकल्प हाती घ्यावा किंवा बिनव्याजी कर्जाची व्यवस्था करावी अशी सूचना केली.**

माननीय माधवराव मराठे M.L.A. यांचे ज्येष्ठ बंधू **व. कृष्णाजी मराठे** यांनी प्रतिष्ठानने **लोकसभा** मतदार संघ आधार धरून क्षेत्रीय **आखणी** करावी आणि **स्थानिक कार्यकर्ते निर्माण करून कार्यविस्तार करावा** अशी सूचना केली. **हळदी-कुंकवासारखे छोटे छोटे कार्यक्रम** आखून महिलांना प्रतिष्ठान कार्याला प्रोत्साहित करावे अशीही सूचना केली.

**माननीय माधवराव मराठे** यांनी आपल्या **सामाजिक** कार्याचा आढावा घेताना प्रत्येक व्यक्तीला **समाज**कार्य करता येईल, फक्त त्यासाठी कार्याची **तळमळ** आणि विधायक विचारशक्ती पाहिजे असा विचार मांडला. विधानसभा सदस्य या नात्याने व **सामाजिक** बांधिलकीच्या दृष्टीने ज्या बांधवांना आजारपणात वैद्यकीय सल्ला वा मदत हवी असेल त्यांना ते मदत करू शकतील असेही त्यांनी आश्वासन दिले. मेळाव्याला बांधवांनी दाखविलेल्या पाठिंब्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे** यांनी समारोपाच्या भाषणात उपस्थितांचे अभिनंदन केले.

पृष्ठ ८ वर



Marathe Pratishthan

# पुण्याच्या २०व्या वर्धापनदिन समारंभाचा वृतांत:२६.१.१९९९

- **सौ. माधवी कमलाकर जाईल** (पृ.७५७), पुणे

२६ जानेवारी १९९९ रोजी सायंकाळी मराठे प्रतिष्ठानचा २०वा वर्धापन दिन वेदशास्त्रोत्तेजक सभागृह पुणे येथे उत्साहाने साजरा करण्यात आला.

मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ कै. बापूसाहेब मराठे यांच्या स्मृतीला वंदन करून सुरवात झाली. 'ॐ नमो जी आद्या' या ज्ञानेश्वर रचित गणेश स्तवनाने सौ. अनुराधा मराठे यांच्या सुमधुर आवाजात कार्यक्रमास सुरवात झाली.

प्रतिष्ठानच्या उत्साही व जागरूक कार्यकर्त्या सौ. नीलांबरी मराठे यांनी कार्यक्रमाचे आखीव व नेटके संयोजन करून प्रभावी निवेदनदेखील केले. त्यांच्या कर्तृत्वाला दाद द्यावी तेवढी थोडीच होईल.

आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व मान्यवरांचा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अण्णा मराठे यांच्या हस्ते श्रीफल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये खालील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

**कु. श्रद्धा मराठे** - १२वी परीक्षेत बोर्डात १ली १०वी परीक्षेत १४वी आली होती.

**चि. रोहीत मराठे** - १२ वीला ९२.९७ गुण मिळवून नॅशनल टॅलंट स्कॉलरशिप

**सौ. चेतना गवाणकर (मराठे)** - गोवा बोर्डात B.E. ३री

**चि. पुष्कराज मराठे** - B.E. परीक्षेत प्रथम वर्ग

**चि. गौरव विद्वांस** - घर नाट्यछटेत प्रथम सध्या प्रिंटींग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा करत आहे.

यानंतर कार्यक्रमास **सहकार्य करणाऱ्या लोकांचा सत्कार** करण्यात आला. श्री. विजय मराठे, मुकुंद मराठे, प्राची मराठे, आरती मराठे यांनी निमंत्रणपत्रिका लिहिण्याचे काम केले. आरती मराठे हिने दारात सुरेख रांगोळी काढली होती.

यानंतर **श्री. सी. गो. खांबेटे, मुंबई, श्री. भास्कर नरहर, रत्नागिरी, श्री. सिताराम वासुदेव, नाशिक,** वय वर्ष ८२, या सर्वांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे हे कार्यक्रमास येऊ शकले नाहीत परंतु त्यांनी आपले मनोगत लिहून पाठविले होते. ते श्री. सी. गो. खांबेटे यांनी वाचून दाखविले. (याच अंकात स्वतंत्रपणे छापले आहे. - संपादक)

त्यानंतर उपस्थितांनी आपली **मनोगते सांगितली. त्यातील विशेष :-**

**चि. श्रद्धा मराठे** हिने प्रतिष्ठानचे आभार मानले व ती पुढे म्हणाली अजून मला यशाचे शिखर गाठावयाचे आहे. नुकतीच सुरवात आहे. तिची एम. एस. करण्याची इच्छा आहे. चिकाटी, मेहनत व नशिबाची साथ मिळाल्यास यश मिळू शकते. केल्याने होत आहे आधी केलेच पाहिजे.

**पुष्कराज मराठे** म्हणाला, प्रतिष्ठानच्या कार्यक्रमास लहानपणापासून येत असल्यामुळे त्याबद्दल आपुलकी वाटते. प्रतिष्ठानचे लोक घरचे आहेत असे वाटत असल्यामुळे हा सत्कार न वाटता घरच्या लोकांनी शाबासकी दिली आहे असे वाटते. तो स्वतः इंजिनिअर असून अंधेरीला सॉफ्टवेअर कन्सल्टंट कंपनीत काम करतो. १२ वीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याची त्याची तयारी आहे.

**श्री. भास्कर मराठे**, रत्नागिरी म्हणाले या निमित्ताने पुण्यातील बांधवांची भेट घेता येईल, म्हणून कार्यक्रमास उपस्थित राहिलो. गेल्या वर्षी रत्नागिरीला झालेले संमेलन यशस्वी होण्यास सर्वांची मदत झाली. पुष्कराज मराठेचे कौतुक केले. सौ. नीलांबरी मराठे यांनी संमेलनाचे आयोजन करून सर्व मराठे बांधवांना एकत्र आणले. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

त्यानंतर **स्वतंत्र उद्योग करणाऱ्या लोकांनी आपल्या उद्योगाची ओळख करून दिली** व प्रतिष्ठानच्या लोकांना मदत करण्याची इच्छा व्यक्त केली.

**श्री. प्रकाश रामचंद्र मराठे** हे केमिकल इंजिनिअर असून ते प्रायव्हेट कोचिंग क्लासेस चालवितात. एस. एस. सी. पासून सतत १ला क्रमांक मिळविला आहे. श्री. खांबेटे यांनी त्यांची स्वतः भेट घेऊन आपुलकीने मराठे प्रतिष्ठानचा सभासद करून घेतले. तसेच मुकुंद मराठे यांनी त्यांचा क्लास मोठा व्हावा म्हणून मदत केली. १२ वर्षे सतत देशात व परदेशात निरनिराळ्या कंपन्यात काम करून खूप अनुभव मिळवला. आजच्या विद्यार्थ्यांना तीव्र कॉम्पिटिशनच्या जमान्यात रफ अँड टफ बनविण्यासाठी अँबिशन व शिस्त यांचे मार्गदर्शन करून त्यांना चांगले विद्यार्थी बनविण्याचे प्रयत्न करणार आहेत. ते ८, ९, १० सेमी-इंग्लिश व कॉन्व्हेंट मधील विद्यार्थ्यांना शिकवत असून त्यांना युनिटी मधील ताकदीचा व मार्गदर्शनाचा नक्कीच उपयोग होईल.

---

**दाद बोरिवलीची** पृष्ठ ७ वरून

एकजुटीने काम करण्यात सर्वांचेच हित असते. प्रतिष्ठानचे कार्य अधिक वेगाने होण्यासाठी उपस्थितांना सक्रीय सहाय्य करण्याचे आवाहन केले.

**डॉ. सुरेंद्रनाथ मराठे निमंत्रक व सहकार्यवाह** यांनी उपस्थितांचे व खास करून मा. माधवराव मराठे यांचे आभार मानताना गोविंद नगर व वजीरा नाका या ठिकाणांच्या महिलांचे बहुसंख्येनी उपस्थित राहण्याबद्दल अभिनंदन केले. विभागीय मेळाव्यांच्या जोडीने अगदी छोट्या म्हणजे एक/दोन कॉलनीपर्यंत मर्यादित असलेल्या बैठकासुद्धा घेण्यास हरकत नाही. उलट या प्रयोगांनी संबंध अधिक दृढ होतील अशी सूचना केली.

कॉफीपानानंतर मेळाव्याचे काम संपले. पण या कौटुंबिक वातावरणातून बाहेर पडावेसे बऱ्याच जणांना वाटत नव्हते. माझ्या मते यातच मेळाव्याचे यश सामावलेले आहे. खरं ना?

***



Marathe Pratishthan

**गजानन मराठे**, इनकमटॅक्स खात्यात काम केले. प्रतिष्ठानमधील लोकांना इन्कम टॅक्स विषयी माहिती मार्गदर्शन करण्यास तयार आहेत.

**रोहन मराठे**, प्रिंटींग टेक्नोलॉजीचे शिक्षण घेऊन प्रिंटींग व्यवसाय करतात.

**श्री. श्रीकांत मराठे**, टेल्कोमध्ये सर्व्हिस करतात. इतर वेळेस ऑफिससाठी लागणारे पडदे, लॅच लॉक यांची घरगुती सर्व्हिस देतात.

**श्री. योगेश मुकुंद मराठे**, आपल्या उद्योगाची माहिती देण्यास येऊ शकले नाहीत. परंतु त्यांच्या आईने, शैलजा मराठे यांनी, कौतुकाने व अभिमानाने आपल्या मुलाच्या उद्योगाबद्दल माहिती दिली. त्याचा वारजे येथे फॅब्रिकेशनचा वर्कशॉप आहे. येथे जीम्स साठी लागणारी उपकरणे तयार केली जातात. तळवलकरांसारख्या जीम्सना ते ही उपकरणे पुरवितात. याला इंटरनॅशनल मान्यता असून लहानांपासून म्हाताऱ्या लोकांना उपयोगी पडतील अशी एकूण ३५ प्रकारची उपकरणे बनविली जातात.

**सौ. उमा मराठे**, या पाळणाघर चालवितात.

**श्री. आशुतोष मराठे** आपल्यावर कुलाचे ऋण आहे असं मानतात. इलेक्ट्रीकल इंजिनिअर असून विश्वकर्मा इंजिनिअरींग कॉलेजमध्ये शिकवतात. सध्या मास्टर डीग्रीचा अभ्यास करतात. घराण्याची शिक्षकाची परंपरा असून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास तयार आहेत.

**सौ. नीलांबरी मराठे**, व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र चालवितात. तेथे I Q टेस्टिंग व Aptitude Testing करतात. मानसोपचार तज्ज्ञांकडून त्यांच्याकडे केसेस येत असतात. मतिमंद, घटस्फोटितांच्या केसेसही त्या हाताळतात. तसेच १०वी व १२वीचे विद्यार्थी यांचे पालक आपल्या मुलाचा बुद्ध्यांक व क्षमता जाणून घेण्यास पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी येतात व Aptitude Testing करून घेतात. त्याचप्रमाणे त्या प्रतिष्ठानतर्फे वधुवर सूचक मंडळ चालवितात. त्यासाठी मराठे बांधवांनी मदत करावी असे आवाहन त्यांनी केले.

तसेच या कार्यक्रमाचा खर्च देणगीच्या व्याजातून केला जातो. तेवढ्या व्याजात तो भागू शकत नाही म्हणून प्रतिष्ठानच्या लोकांनी त्यासाठी हातभार लावावा असेही त्यांनी आवाहन केले.

पुण्यात जेवढे मराठे परिवार आहेत. त्यातील बरेच लोक अजून सभासद झालेले नाहीत त्यांना सभासद करून घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम करण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांनी पुढे येऊन हे काम करावे अशी विनंती केली.

**श्री. सी. गो. खांबेटे** हे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष असून त्यांनी प्रतिष्ठानच्या परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी पुण्यातील ४१९ कुटुंबियांची कॉम्प्युटरवर यादी करून दिली आहे. त्यांना हितगुजचे सभासद करून घेऊन प्रतिष्ठानचा पाया बळकट करावा असे त्यांनी आवाहन केले.

तसेच ज्यांचा कॉम्प्युटर उद्योग आहे त्यांनी पुण्यातील मराठे कुटुंबियांची डिरेक्टरी बनविण्यास मदत करावी असेही त्यांनी सुचविले.

**चित्पावन संघाचे कार्यकर्ते श्री. भावे** यांचे मनोगत वाचून दाखविण्यात आले. आपला समाज जवळ कसा येईल त्यासाठी कार्यवाही करावी. फक्त आपल्या कुलापुरते मर्यादित न रहाता सर्व चित्पावन मंडळींनी जवळ यावे.

त्यानंतर सौ. नीलांबरी मराठे यांनी अध्यक्ष श्री. अण्णा मराठे यांचा श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री. धनंजय मराठे व त्यांच्या साथीदारांचाही सत्कार करण्यात आला.

नंतर **करमणुकीचे कार्यक्रम** सादर करण्यात आले. **चि. सायली मराठे** हिने कविता वाचन केले व नवरसात वाक्य म्हणून दाखविले. **चि. गौरव मराठे** यांनी घर ही नाट्यछटा सादर केली. **चि. धनंजय मराठे** यांच्या सुरेल संगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांनी अल्पोपहाराचा स्वाद घेऊन एकमेकांचा निरोप घेतला.

**सौ. नीलांबरी मराठे** यांनी आर्थिक सहकार्याचे आवाहन केल्यावर या कार्यक्रमास आलेल्या सभासदांनी उत्स्फूर्तपणे मराठे प्रतिष्ठानला खालीलप्रमाणे देणग्या दिल्या -

| | |
|---|---|
| १) चि. पुष्कराज वामन मराठे | रु. १५१ |
| २) सौ. उर्मिला दिनकर मराठे | रु. ५०१ |
| ३) सौ. मीना भालचंद्र मराठे | रु. ५०० |
| ४) श्री. प्रकाश भालचंद्र मराठे | रु. २०० |
| ५) श्रीमती स्वाती गजानन अभ्यंकर | रु. २०० |
| ६) श्री. वासुदेव दत्तात्रय मराठे | रु. १०० |
| ७) सौ. निर्मला श्रीपाद मराठे | रु. ५०० |
| ८) श्री. मोरेश्वर गजानन विद्वांस | रु. १५१ |
| ९) श्री. दामोदर रघुनाथ मराठे | रु. ५० |
| १०) श्री. मुकुंद सीताराम मराठे | रु. १०० |
| ११) श्री. प्रकाश रामचंद्र मराठे चेक | रु. ५०१ |
| **एकूण** | **रु. ३१५४.००** |

**श्री. महेश दिनकर मराठे यांच्या आईने शिक्षण निधीसाठी २००० रु. देणगी** दिली आहे. आईचे नाव **श्रीमती विजया दिनकर मराठे**. (कै. दिनकर कृष्णाजी मराठे यांचे स्मृतीप्रित्यर्थ)

**श्री. गजानन मराठे यांनी आपल्या वडिलांची आठवण म्हणून ग्रंथालय चालू करण्यासाठी सुमारे ४००० रुपये किंमतीची ४४ पुस्तके** प्रतिष्ठानला भेट दिली. याबाबत पुणे शाखेतर्फे असे आवाहन करण्यात आले की-
१) ज्यांना पुस्तके भेट देण्याची इच्छा असेल त्यांनी ती अवश्य आणून द्यावी. कोणत्याही विषयावरची पुस्तके स्वीकारली जातील.

२) भेट आलेल्या पुस्तकांचा वाचनासाठी उपयोग प्रतिष्ठानचा कोणताही सदस्य (कुलबांधव, कुलभगिनी) करू शकेल. ही पुस्तके वाचून पुन्हा परत करावीत.

३) सध्या ही सर्व पुस्तके पुणे शाखेचे चिटणीस श्री. अरुण मराठे १७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे ४११०३०. फोन - ४७३२८१ यांच्या घरी आहेत. ज्यांना या योजनेचा फायदा घ्यायचा असेल त्यांनी श्री. अरुण मराठे यांच्याशी संपर्क साधावा.

४) लवकरच पुणे शाखा भेट आलेल्या पुस्तकांचे ग्रंथालय सुरू करणार आहे. ते चालवणाऱ्या व्यक्तिचे नाव व पत्ता, नंबर कळवण्यात येईल.

Marathe Pratishthan

# चिंता नको, चिंतन हवे

**- वामन गणेश** (पृ.५०३), नेरूळ, नवी मुंबई

आजचा दिवस संपला, उद्या सकाळी काय उगवेल ह्याचा विचार आज सगळ्यांनाच पडत असतो. त्यासाठी आपण सर्वच कुलबंधु-भगिनींनी वेळेचे आणि देहाचे भान ठेऊन चिंतन करण्याची वेळ आलेली आहे. मग ते चिंतन कसले बरे करावयाचे? त्याचाच ऊहापोह मी करणार आहे. वाटल्यास आपणही माझ्यासारखे चिंतन केलेत तर मलाही बरेच वाटेल.

१) आजच्या यंत्रयुगात सगळेच जीवन Push Button टाईप झालेले आहे. म्हणजेच यंत्रमानव आमचा हेड ऑफ दि फॅमिली झाला आहे. सफाई, धुलाई, फास्ट फुड, गाडी, स्कूटर वगैरे वगैरे

२) पायी चालण्याची सवय झालेली नसल्याने आणि आई-वडिलांच्या कडेवर बसण्याची सवय मुलांना नसल्याने एका हाकेवरची शाळासुद्धा दूर वाटू लागली आहे.

३) भाजीपोळीऐवजी कुर्कुर चिप्सची सवय झालेली आहे. बोटे मोडून पाढे म्हणण्याची पाळी तर येतच नाही. कारण कॅलकुलेटरचे खेळणे सुलभ व मस्त आहे. त्यामुळे दप्तर सुंदर पण ओझे असणारे त्यामुळे बरोबर एक माणूस दिमतीला हवाच.

४) होमवर्क तर 'आया क्या गया क्या हुवा क्या लिखा क्या' ह्या भाषेत साऱ्याच मुलांच्या आयाच ऑफिसमध्ये करून आणतात.

५) म्हणजेच 'कॉपी टु कॉपी' असे मुलांचे जीवन आपण उध्वस्त करू लागलोत. हे थांबणे अगत्याचे आहे. त्यांना प्रत्येक वस्तूचे व गोष्टीचे महत्व ज्ञात होणे जरूर आहे.

६) सरस्वती वंदना की चंद्रवंदना ह्यापेक्षा 'सांगे गुरु आणि आपुला बाप' ह्याचे ज्ञान होणे महत्वाचे असावे.

७) मला जे हवे ते मी मिळवतो. अशी जाहिरात आदर्श नाही. त्यामुळे मुले हट्ट करून सगळे साध्य करून घेतात. श्रमशक्तीला आपण वाव देत नाही. उलट आळशी, कामचुकारपणा त्यांच्या अंगी बाणवतो. हे होऊ नये. ह्यासारख्या इतर बऱ्याचशा गोष्टींचे चिंतन व परिशीलन करणे क्रमप्राप्त आहे.

८) पालकांचा व मुलांचा, मुलींचा सुसंवाद होणं अपरिहार्य आहे. तो नसेल तर फक्त मुलांना भारंभार पैसे देऊन शिकवण्यांना आणि क्लासेसना पाठवून आपली बांधिलकी आपण झटकून टाकतो. हे बरोबर नाही. दररोजच्या मोठमोठ्या अशा क्लासेसच्या जाहिराती येतात. त्याचा उपयोग काहीही नाही. निदानपक्षी इ. १०वीत मुलगा, मुलगी जाणार असेल तर त्याची तयारी आई-वडिलांनी इ. ८वी पासूनच करावयाला हवी. त्यासाठी पालकांनी पूर्ण योजना आखणे जरूर आहे. सुज्ञांस अधिक सांगणे नलगे! ###

### कोकणात रहाण्याची सोय

प्रतिष्ठानचे **पूर्वकार्यवाह वामन गणेश** (पृ.५०३) यांनी कोकणातल्या तुळस येथील (सावंतवाडीजवळ) आपल्या घरी कुलबांधवांची रहाण्याची सोय करण्याची तयारी दर्शवली आहे. **तिथला पत्ता** : बाळाभट गणेश मराठे, श्रीविठोबाचे देवळाजवळ, मु. पो. तुळस, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग, पिन-४१६५१५

दोनचार दिवस कोकण दर्शनसाठी जाणाऱ्या कुलबांधवांनी तेथील सोयीसुविधा व अन्य माहितीसाठी **वामन गणेश, स्टेट बँक कॉलनी, बी- ४/३, सेक्टर १३, नेरूळ, नवी मुंबई ४०० ७०६ (फोन - ७६१५४१२) या पत्यावर संपर्क साधावा.**

# चित्तपावन कपिगोत्री नागपूरस्थित मराठे मंडळींचे मकर संक्रमण संमेलन

**- प्रभाकर केशव** (पृ.३७२), नागपूर

रविवार, दि. १० जानेवारी १९९९ दुपारी ४ वाजता नागपुरातील चित्तपावन कपिगोत्री मराठे कुटुंबीय मकर संक्रांतीच्या शुभ पर्वावर देवी अहिल्या मंदिरात चतुर्थ संमेलनासाठी एकत्र झाले. (यापूर्वीची संमेलने दि. १२ जुलै, १५ ऑगस्ट आणि ४ ऑक्टोबर १९९८) प्रास्तविक भाषणात या मेळाव्याचे **निमंत्रक प्रभाकर केशव** (पृ.३७२) म्हणाले - १९९९ या नवीन वर्षाचे आजचे संमेलन वर्ष सर्व कुलबांधवांना सुखसमृद्धीचे जावो अशी शुभेच्छा आपण करूया. कुलवृत्तांताच्या माध्यमातून प्रथमतः १९४६ नंतर द्वितीय आवृत्तीद्वारे १९९१ मध्ये मराठे कुलबांधवांची जवळीक झाली आहे. ११५ घराण्यांपैकी ४४८० व्यक्ती १९९१ च्या दुसऱ्या आवृत्ती प्रकाशनाचे वेळी हयात होत्या. आज १९९९ या वर्षात आठ वर्षांनंतरची ही संख्या किती असावी हे आपणा सर्वांना माहिती असायला हवे. त्याचसाठी कुलवृतांत प्रकाशन समितीचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. कुलवृत्तांताच्या तृतीय आवृत्तीकरिता आपण सर्व मंडळींनी आपापल्या कुटुंबाची अद्ययावत माहिती शीघ्रतेने द्यावी हा महत्वाचा संदेश अशा संमेलनातून व्यक्त करण्यात येत आहे.

'हे विश्वचि माझे घर' असे संतवचन आहे. विश्वबंधुत्वाची महती यातून व्यक्त होते. एकविसाव्या शतकाला सामोरे जाताना आपणा मराठे मंडळींची यासाठी काय तयारी आहे, राष्ट्राच्या हितासाठी 'मराठ्यां'चा यात सहभाग कोणता व किती राहील, असा विचार प्रत्येकाच्या मनात पाहिजे. शिक्षण, संशोधन, व्यवसाय, राजकारण, समाजसेवा इत्यादी क्षेत्रात कुलबांधवांचे स्थान अग्रेसर राहील याची जाण आपणाला हवी.

आज नागपुरात २१ घराण्यांतील १२२ स्त्री-पुरुष आहेत. ही उपलब्ध माहिती आज प्रत्येक कुटुंबाला देण्यात येत आहे. यातील उणीवा दूर करून माहिती अद्ययावत करण्याचा आपला प्रयत्न

पृष्ठ ११ वर



Marathe Pratishthan

# विलंब : आपल्या प्रगतीचा शत्रू

- **कै. श्रीधर परशुराम** (पृ.९८) ऊर्फ बापूसाहेब मराठे, पुणे

वेळ म्हणजे पैसा अशी एक जुनी म्हण आहे. वेळाचा जास्तीत जास्त उपयोग पैसा कमविण्यात कसा करता येईल याचे अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याकरता आज उद्योगपती आणि कारखानदार जी धडपड व जिवापाड मेहनत घेत आहेत त्यावरून वरील म्हण आजही सत्य बोधक आहे असे म्हणावे लागेल.

आजच्या कारखानदारीत प्रत्येक क्षणाची किंमत रुपये पैशात केली जात आहे. काळाचा सदुपयोग ही कारखानदारीत अतिशय महत्वाची बाब समजली जात आहे आणि विलंब टाळण्यावर कटाक्षाने लक्ष दिले जात आहे. जास्तीत जास्त उत्पादनक्षमतेत थोडीही न्यूनता भासल्यास त्याचा दोष 'विलंबा'चे माथी मारला जात आहे. हा काळचोरच आपले मानगुटीस बसला आहे असे कारखानदार हमखास मानतात!

पण हे खरोखरच पूर्ण सत्य आहे का? याचा शोध घेण्याकरिता निम्नलिखित गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरेल.

**आत्मसंशोधन**

१) आजचे काम उद्यावर ढकलीत असता उद्या उरकणार नाही इतका कामाचा बोजा उद्याला जमा होत आहे की काय?

२) पुढे कामाची गती वाढवून आखीव वेळात आपण काम पूर्ण करू या भावनेने आज आपण जाणून बुजून काम मंदगतीने करीत आहोत काय?

३) एखादे काम कठीण आहे म्हणून त्याची सुरवात करायलाच आपण चालढकल करून विलंब लावीत आहोत काय?

४) कामाची सुरवात ताबडतोब करणे आवश्यक असतानाही हवाल्यावर हवाला देऊन आपण टाळाटाळ करीत आहोत काय?

विलंब करण्यात सर्वांचाच हातखंडा असतो. पण प्रत्येकाचे प्रमाणात फरक असतो. कोणी कमी प्रमाणात दोषी असतो तर कोणी जास्त! विलंबामुळे कालापव्यय होऊन उद्दिष्टपूर्ती निश्चित लांबणीवर पडते. उद्दिष्टपूर्ती झालीच तर ती अपूर्ण असते. परिणामी वैफल्य येते. कार्यपूर्तीचा आनंद मिळत नाही. दुधात मिठाचा खडा पडल्यासारखे होते!

नावडीचे किंवा कठीण काम करण्यास आपण नेहमीच विलंब लावतो. परीक्षेत कठीण प्रश्न शेवटी सोडविण्याकडे आपली प्रवृत्ती असते. अनावश्यक काम हाती घेऊन नावडीचे कामास विलंब लावणे हा आपला नेहमीचाच अनुभव आहे.

कठीण किंवा नावडत्या कामाची सुरवात करण्यात विलंब करण्याकरिता आपण अनंत कारणे शोधीत असतो. या कामाचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे असा ठेका आपण धरतो. दप्तर दिरंगाईतही काम झाकून टाकण्याचा प्रयत्न होतो. लहानपणापासूनच काहींचे अंगी अशी सवय जडलेली असते की, आपण शक्य तितका विलंब लावल्यास कोणीतरी रागाने का होईना ते काम करून टाकतो आपण त्याच क्षणाची वाट पाहतो. लेखक, कवी, कलाकार आपणास अजून स्फूर्ति झाली नाही अशी सबब पुढे करतात. एकूण काय 'अशुभस्य कालहरणम्'!

**विलंबावर मात**

या विलंब प्रवृत्तीवर मात कशी करावी? हा कटू प्रश्न होऊन बसला आहे. आजचे आजच काम केले पाहिजे ते लिहून काढावे. सर्व कामांची यादी करावी. त्यांचे महत्वाप्रमाणे त्यांना कालानुक्रम द्यावा. प्रत्येक कामास किती काळ खर्च होईल, याचा अंदाज करावा. प्रत्येक काम आखलेल्या कालावधीत पूर्ण करावे. कामांच्या नोंदीतल्या काल मर्यादांचा मधून मधून पुनर्विचार करावा व जरूर तर नवी काल मर्यादा मुक्रर करावी.

जे काम कठीण व महत्वाचे असेल त्यास अग्रक्रम द्या आणि ते आखीव कालमर्यादेत पूर्ण करा. त्या पूर्तीचा आनंद मनमुराद लुटा! त्या आनंदात पुढील कामे हाती घ्या व पहा द्विगुणित जोमाने ती आपण पार पाडाल. आनंद वर्धित होईल. थोडा गत कालावर दृष्टिक्षेप टाकल्यास

---

**मकर संक्रमण संमेलन** पृष्ठ १० वरून

राहील. एकाच घराण्याचे नागपुरात आपण कोण कोण आहोत हे सोबतच्या संकलित माहितीवरून आपणास कळेल. कुटुंबातील विशेष कार्यप्रसंगी कुलबांधवांना आपण निमंत्रित करू शकतो. त्याद्वारे आपली जवळीक वाढेल. एकाच गावात विखुरलेले १२२ कुलबांधव 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ', या भावनेने एकत्र येतील.

मकर संक्रमणाचा दिवस फार आनंदाचा आहे. आजच्या दिवशी आपले मनोरथ यशस्वी व्हावे म्हणून केलेल्या प्रयत्नांना ग्रहमानाचेहि बळ मिळते. आपणा सर्वांना मिळून नागपूरला ११५ घराण्यांचे व्यापक संमेलन घ्यायचे आहे. यापुढच्या संमेलनात विदर्भातील कुलबांधव एकत्र येतील असा प्रयत्न करायचा आहे. आपण सर्व एकोप्याने कार्यरत होऊ या ही शुभेच्छा!

या मेळाव्यात सर्वश्री रघुनाथ पुरुषोत्तम (२३६) ज.स. १९०८, गोविंद महादेव (६०८) ज.स. १९११ व रामचंद्र विश्वनाथ (२३१) ज.स. १९२० या ज्येष्ठांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ. प्रज्ञा अरविंद (८६२) यांनी त्यांच्या वडिलांनी रचलेले संक्रांत गीताचे मधुर आवाजात गायन केले. कु. शर्वरी सतीश (पृ.२३६) या १९९८ च्या माध्यमिक शालांत परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थिनीच्या यशाबद्दल अभिनंदन केले. माहे डिसेंबर १९९८ च्या 'हितगुज' मध्ये तिचा फोटो प्रकाशित झाला आहे. मालतीबाई मधुकर (पृ.१५४) यांचे दि. २९.१०.९८ ला दुःखद निधन झाले. त्याबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला.



Marathe Pratishthan

## ... एकच पक्ष नाही पुरणार!

काँग्रेस काय भाजप काय पुरे झाला प्रचार
स्वस्थ चित्ताने आता योजनांना द्या आकार

कोणी काय केलं नाही त्याचा नको प्रचार
देशासाठी काय करायचं त्याचा करा विचार

पार्टी बदलण्यापेक्षा देशाचं चित्र बदला
बरबटलेल्या हातांसकट भ्रष्टाचाराच्या इमारती पाडा

कुणालाही संपवायचे म्हटले तर वेळ नाही लागणार
बरबटलेले हात तोडायला एकच पक्ष नाही पुरणार

- **सारिका भास्कर**, वाडा (पृ.२० दत्तात्रेय विष्णु यांचा मुलगा भास्कर यांची मुलगी)

कल्पनातीत कामे पूर्ण केल्याचे आपणास दिसेल व आपले समाधान कितीतरी पटीने वाढलेले असेल! आंतरिक समाधान मिळेल व पुढील काळात आपल्याला उमेदीने आणि उभारीने नवनवीन व कठीण कामे आत्मविश्वासाने हाती घेता येतील. आत्मबल वाढल्याचे आपल्या लक्षात येईल.

आजची कामे पुरी झाली की उद्याची, उद्याची पुरी झाली की पुढील आठवड्याची आणि मग पुढील महिन्याची, वर्षाची अशा क्रमाने आपण प्रगती करीत जावी.

विलंब टाळण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे कोणतेही काम करण्याचे निश्चित केल्याबरोबर ते हाती घेऊन कार्यवाही सुरू करा व तडीस न्या. नुसती सुरवात करणे म्हणजे पूर्तता नव्हे हे लक्षात असू द्या. दिरंगाईने अनुत्साह निर्माण होण्यापलिकडे हाती काही लागत नाही. आयुष्यातील कोणत्याही कार्यक्रमात विलंबाला थारा न देणे इष्ट. मग ती जबाबदारी कौटुंबिक असो वा उद्योगधंद्यातील. धर्माचरणाच्या बाबतीत तर हेच वचन डोळ्यासमोर नेहमी असू द्यावे.

गृहीत इवं केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।

('प्लेन टुथ'चे जानेवारी १९८६ चे अंकातील डी. एच्. फॉकनर यांचे लेखाचे आधारे - गीतादर्शन, सप्टेंबर १९८८ अंकातून साभार)

# पदर

- **मीनाक्षी अंकलीकर**, शीव (पृ.६९८ - अ. धों. खांबेटे यांची बहीण)

पदर हा वेलांटी, काना, मात्रा, उकारादी सर्व विकारांपासून अति अलिप्त असा सुंदर सुटसुटीत व मुलायम, नाजुक अशा भाववलयाने बनलेला शब्द. अर्थात याला पार्श्वभूमीही, तितकीच तलम, सुरेख व रेखीव अशा वस्त्रप्रावरणांनी नटलेल्या ललनांची!

गेल्या २०-२५ वर्षात मात्र या पदराचा नक्षा नाहीसा झालेला दिसतो. 'गाऊन'नामक पोकळ नि भोंगळ व आकारहीन अशा डगल्याने पदराची जागा बळकावली, व पदराचे सौंदर्य दृष्टीआड झाले. त्यामुळे स्त्री सुलभ लज्जा हा सुंदरभाव चेहऱ्यावरून पुसला गेलासे वाटते, कारण झांकण्यासारखे काही राहिलेच नाही.

गोजिरवाण्या तान्हुल्याला पदराआडचा ब्रह्मानंद दुरापास्त झाला. दुडदुड धावणारे बाळ वरचेवर पडते नि रडते. त्याचे नाक डोळे पदराने पुसणार कसे? पदराच्या उबेत त्याचे सर्वस्व, सर्व दुःखांवर रामबाण अशी माया व वात्सल्य होते.

प्रापंचिक संसारात स्त्रीला आधार भक्तिभावनेचा. पण त्यासाठी देवीपुढे पदर पसरून मागणं कसं मागणार ती? कुटुंबातील जिव्हाळ्याच्या माणसांसाठी वेळप्रसंगी पदरमोड करून घरची स्त्री पदराला खार लावून प्रसंग निभाऊन नेत असे, ही गोष्ट आता अशक्यच!

लग्नाच्या मुलीला भावी वरासंबंधी पसंती विचारली तर ती पदराच्या टोकाशी चाळा करून वा दातात धरून हे-हो काय बाबा? असे लाडिक उद्गार काढायची वेळ यापुढील काळात येणार नाही. 'वायुने पदर फडफडे' ही गोफणवाली कवितेतील ओळ गुणगुणण्यांत काय शृंगार राहिला? जरतारीचा मोर शालूवरती तरी अवतरणार कोठे? टी.व्ही. वरील सॅनेटरी टॉवेल्स जाहिरातीमुळे मुलीला पदर आला असे गूढ परंतु नाजूक भाषेत बोलायची आता गरजच संपली. माझ्या लाडक्या लेकीला तुमच्या पदरात घालते, सांभाळा असे वरमाईला विनवायला जागाच कोठे उरली? शेजारणीकडून वेळप्रसंगी पदराआडून उसनं-पासनं झाकून आणण्याची आता पंचाइतच झाली. अपराधाचं अथवा चुकीचे माप आता टाकायचं कुठं? नळांवर पाण्यासाठी एक पदरीवर येऊन, आडवा पदर बांधून आता खडाजंगीही होणार नाही आणि पूर्वीसारखी पदर खोचून झटपट कामंही होणार नाहीत. एकादीच्या पदरात सात-आठ पोरं आहेत असं म्हणण्याचा सुतराम संभव नाही.

शिवाजी राजे, अकबर बादशहा यांचे पदरी निवडक सत्गुणी नररत्ने होती. ते आदर्श राजे अस्तंगत झाले, त्याचबरोबर पदरही अंतर्धान पावला!

एकूण काय? पदर उडून गेला आणि त्याची जागा अघळ पघळ डगल्याने घेतली. तेव्हा, 'पदरी पडलं, नि पवित्र झालं' अशी नुसती म्हणच फक्त आठवायची. कारण पदर बेपत्ताच.

तात्पर्य, अनेक गोष्टींना झाकणारा, सावरणारा, खुलवणारा, आधार देणारा, वात्सल्य बहाल करणारा पदर आता अदृश्य झाला नि त्याचा महिमा संपला.

कालाय तस्मै नमः।

## प्रतिसाद

डिसेंबर १९९८ अंकात प्रतिष्ठानच्या १६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वृत्तांतामध्ये काशिनाथ (प्रकाश) श्रीधर (पृ.१९) यांच्या उद्योग प्रवर्तन निधी स्थापन करण्याबाबतच्या सूचनेचा उल्लेख आहे. (हितगुज सप्टेंबर अंकात पृ. ९ वर या कल्पनेचा तपशील आहे.) हा उल्लेख वाचून **अमेरिकेहून विनायक गोपाळ** (पृ.६९) **लिहितात** - 'उद्योग प्रवर्तक निधी स्थापन झाल्यास मला छोटीशी रु. दहा हजाराची देणगी देण्याची इच्छा आहे.'

***(अशा आणखी 'इच्छुकांची' वाट पहात आहोत. 'इच्छा तेथे मार्ग' या न्यायाने लवकरच हा निधी स्थापन होईल अशी आशा करूया. - संपादक)***



Marathe Pratishthan

# सदूभटजी

\- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

सदूभटजी आमच्या चाळीत केव्हा आले ते कुणीच सांगू शकत नव्हते. पण सदूभटजी हे आमच्या चाळीचा एक हमखास चर्चेचा, टिंगलीचा विषय होता हे मात्र खरे.

सदूभटजी पहिल्या मजल्यावरच्या घारूअण्णांकडे रहात. रहात म्हणजे त्यांची वळकटी आणि ट्रंक घारूअण्णांकडे ठेवलेली होती. सदूभटजी पहाटे उठत. मजल्यावरच्या सार्वजनिक नळावर स्नान आटोपून ते गॅलेरीतल्या दांडीवर धोतर, सदरा, उपरणं वाळत घालीत आणि नाक्यावरच्या देवळात जात. तिथले पुजारी वासूनाना सदूभटजीचे मावसभाऊ. तेथेच संध्या उरकून ते घोटभर चहा ढोसत आणि यजमानांकडे धर्मकृत्यांसाठी जात. त्यानंतर एकदम रात्रीचं ज़ेवण आटोपून ते गॅलेरीतल्या बाकावर घटकाभर चाळीचा समाचार घेत. न विचारता सल्ला देत. रात्री दहाच्या ठोक्याला खिशातले पैसे ट्रंकेत ठेऊन ते पथारी पसरत.

चाळीतल्या बायकांच्या हरताळका, वडाच्या पुजा सदूभटजींच्या मदतीनीच होत. बायकांनी दिलेली वाणं ते घेत पण फळं मात्र पोरांना वाटून टाकीत. लग्नकार्यात मिळालेला शिधा ते घारूअण्णांकडेच देत. कारण यजमानकार्य नसलं म्हणजे त्यांच पान घारूअण्णांच्या शेजारी असायचं.

सदूभटजींची वाणी खणखणीत. वेदमंत्र ते अतिशय स्पष्ट सुरात व लयीत म्हणत. रविवारच्या मोकळ्या वेळात ते पोरांना रामरक्षा शिकवीत.

कोणतीही थाप, कोणताही विनोद त्यांच्या नावावर सहज खपून जाई. पुरुषच काय पण चाळीत्या बायकासुद्धा त्यांना नाना नावांनी उल्लेखत. 'नयन मनोहर', 'बेडक्या भटजी', 'किंचित गंधर्व', 'उगीच नारायण' एक ना दोन. एकदा घारूअण्णा सदूभटजींना चक्क म्हणाले, 'गुरुजी तुम्हाला माहीत आहे लोक तुमच्या पाठी काय म्हणतात ते?'

सदूभटजी चटकन म्हणाले, 'हो त्यात काय आहे? मी त्यांच्या जागी असतो तर सदूभटाला आणखी चार नाव ठेवली असती. पण घारूअण्णा 'किंचित गंधर्व' आणि 'उगीच नारायण' हे कोणाचे शोध हो? काय सुंदर उपमा आहेत. आपण बुवा अगदी खूष आहोत. आणि घारुअण्णा माझी टिंगल करताना तुम्ही सुद्धा अगदी रंगून जाता खरं ना?' घारूअण्णा यावर काय बोलणार?

चातुर्मासात, त्यातल्या त्यात श्रावण महिन्यात, सदूभटजींची धावपळ उडत असे. श्रावणी सोमवार अभिषेक करून करून त्यांचा घसा कोरडा पडे. श्रावणी सोमवारचा उपवास सदूभटजीनी आपल्याकडे सोडावा म्हणून चाळकरी टपलेले असत. चाळीतल्या लग्नकार्यात सदूभटजींनी हमखास आमंत्रण. कुळोपाध्ये लग्न लावीत पण सदूभटजींचा योग्य तो मान राखून वरातीच्या वेळी जोडपं सदूभटजीच्या पाया पडायला येई. चाळीच्या माहेरवाशीणीला सासरी जाताना पाहून म्हणत, 'जा. बाबी अगदी आनंदात सासरी जा, गो. आम्हाला वाईट वाटायचेच. काळीज घातलाय ना छातीत देवानी. हे बघ बाळ मी सांगतो त्या गोष्टी नीट लक्षात ठेव. सासरच्या माणसांची पारख झाल्याशिवाय तोंड उघडायचं नाही. हुं ला हुं एवढंच. माहेरच्या गोष्टी सासरला आणि सासरच्या गोष्टी माहेरला सांगायच्या नाहीत. म्हणजे अगदी लहान सहान गोष्टी चालतील गो. आणखी एक गोष्ट. घो संध्याकाळी दमून भागून आला की लगेच घरचं पुराण सांगायचं नाही. तो बोलू लागला की शांतपणाने ऐकायचं आणि त्याचा रागरंग बघून घरच्या गोष्टी त्याच्या कानावर घालायच्या. घरातून बाहेर कामावर जाताना कोणतीही गोष्ट काढायची नाही. काय असेल ते अगोदर सांगायचं. कळलं? एवढं सांभाळ म्हणजे तू सासरची राणीच होणार.'

उपदेशाचा मार झाल्यावर सदूभटजी कडोसरीतलं नाणं बाहेर काढून वधूच्या हातात ठेवीत म्हणायचे 'हे नुसतं रुपयाचं नाणं नाही. हा माझा मंतरलेला प्रसाद आहे. तुझ्या दागिन्याच्या डब्यात ठेव. कशाला म्हणून कमी पडणार नाही. बापसाकडे आल्यावर मला हाक मारीत जा. हो. तुझ्याबरोबर गप्पा आणि तुझ्या बापसाकडचा फुक्कटचा चहा. खरे की नाही?' सदूभटजी स्वतःच्या विनोदावर खो खो हसायचे.

का कुणास ठाऊक? मला मात्र या सूदभटाबद्दल लहानपणी अगदी किळस वाटायची. हा दरिद्री भिक्षूक मला जावईबापू म्हणत असे. माझे वडील सुखवस्तू होते. त्या बालवयातसुद्धा सदूभट गरीब, आपल्या बरोबरीचा नाही हे मला जाणवत होतं. आई आणि काका (मी वडिलांना काका म्हणत असे) मात्र सदूभटजीचा मान ठेवीत. सदूभटजी घरी आल्यावर नुसत्या चहावर कधीच जात नसत. फराळाची बशी त्याच्यापुढे येई. आईच्या हातचे पदार्थ सदूभटजींनाच का सर्व चाळकऱ्यांना आवडत. त्यातून सदूभटजीचे बिऱ्हाड नाही. आईचं माहेर सदूभटजींच्या गावाशेजारी. आईला सखखा भाऊ नाही, तेव्हा सदूभटजींच्या

## अनुकरणीय

**नाशिकमधील कुलबांधव कॅप्टन आनंद अरविंद चक्रदेव** (पृ.७३७) यांनी नाशिकमधील २९ मराठे कुटुंबियांना पत्रे पाठवून (१) मराठे प्रतिष्ठानचे आजीव सदस्य व्हावे (रु. १००), (२) प्रतिष्ठानचे त्रैमासिक 'हितगुज'ची तहहयात वर्गणी रु. २०० पाठवावी आणि (३) आपल्या कुटुंबियांची अद्यायवत माहिती कुलवृत्तांताचे नूतनीकरण करण्यासाठी पाठवावी, असे आवाहन केले आहे.

याचप्रमाणे **सांगलीत स्थायिक झालेले निवृत्त कार्यकारी अभियंता विठ्ठल महादेव** (पृ.२३५) यांनीही सांगली जिल्ह्यातल्या कुलबांधवांना वरीलप्रमाणे पत्रे पाठवली आहेत.

***(इतरही गावातल्या कुलबांधवांनी आपापल्या जिल्ह्यांत हे काम करण्यासाठी आपण होऊन पुढे यायला हवे. त्यांनी प्रतिष्ठानला लिहावे म्हणजे त्यांच्या जिल्ह्यातल्या कुलबांधवांचे पत्ते त्यांना पाठवण्यास येतील. - संपादक)***



Marathe Pratishthan

**हसरे हितगुज**

## रसिक रिक्षावाला

एका रिक्षामध्ये आत बसलेल्यांना दिसेल अशा तऱ्हेने सिनेमाच्या गाण्यातील खालील ओळी लिहिलेल्या आढळल्या -

तुम तो ठहरे परदेसी,
साथ क्या निभाओगे?

किती चपखल ओळी! रिक्षावाल्याच्या रसिकतेला दाद द्यावी तेवढी थोडी!!

रूपाने आईचं माहेरचं घरी आल्यासारखं होई.

सदूभटजी त्यांच्या बहीणींचा उल्लेख काकांसमोर कितीतरी वेळा करीत.

'केशवराव, माझ्या पाठच्या दोन्ही बहिणी उजवण्याअगोदर देवाघरी गेल्या. देवानी त्यांना रूप दिलं आणि त्यांचं आयुष्य काढून घेतलं. खरं सांगतो केशवराव माझ्या पाठची गंगू अगदी थेट गोदूताईसारखी दिसे. गंगूस लपवावे आणि गोदूताईस पुढे आणावे. काही म्हणता काही फरक नाही. या बघा गोदूताई इथं आहेत. विचारा त्यांना.'

हा खत्रूड माणूस माझ्या आईची बरोबरी त्याच्या बहिणीबरोबर करतो हे पाहून मी संतापून पाय आपटून निघून जाई.

गणपतीला आठ दिवस होते. चाळीत नाटकांच्या तालमींची धामधूम चालू होती. एवढ्यात सदूभटजींना गावाहून तातडीचे बोलावणे आले. सदूभटजी लगबगीने गावी गेले.

चाळीत बातमी पसरली. तर ओलांडताना होडी उलडून सदू भटजींची बायको आणि एकूलती एक मुलगी बुडून मेली. पोलिसांच्या फेऱ्यात सापडल्यामुळे सदूभटजी गावाला गेल्यावर पुढचे विधी झाले.

पंधरा दिवसांनी मान खाली घालून सदूभटजी घारूअण्णांच्या गॅलेरीत आले. पडशी जमिनीवर टाकीत सदूभटजी गॅलेरीतल्या बाकावर डोक्याला हात लावून बसले. माणसे गोळा झाली. घारूअण्णांनी त्यांना घरात नेले.

त्यादिवशी संध्याकाळी सदूभटजी आमच्या घरी आले. चाळीतल्या सार्वजनिक गणपतीचा प्रसाद आमच्याकडचा होता. हिरव्या वाटाण्याची उसळ आणि गुळ खोबऱ्याचा प्रसाद होता. सर्व प्रसाद तयार करून आई बाहेरच्या खोलीत गणपतीच्या आरतीचं तबक तयार करीत होती. काका झोपाळ्यावर बसून सावकाश झोके घेत आईशी गप्पा मारीत होते. गणपती गेल्यावर पावसाळ्यानंतर आमची पहिली मॅच शांतारामाच्या चाळीच्या टीमबरोबर होती. मी बॅटीला बेल तेल लावत होतो. सदूभटाला पाहून मी बॅट तिथेच टाकून बाहेर जाण्याच्या तयारीत होतो. सदूभटजीचा चेहरा पाहून मला त्यांची कणव आली. मी बसून राहिलो.

सदूभटजींना चाळकरी गुरूजी म्हणत. अपवाद फक्त आमच्या घरचा. आई माहेरच्या नात्याने सदूभाऊ म्हणे. तर काका त्यांना चक्क सदाशिवराव म्हणत.

सदूभटजी बसा म्हटल्याशिवाय कधीही बसत नसत. त्या दिवशी मात्र त्यांना स्वतःला सावरता आलं नाही. दरवाज्यालगत ते जमिनीवरच बसले आणि मुसमुसू लागले. आई-काका क्षणभर स्तब्ध होऊन त्यांच्याकडे पहात राहिले. काय बोलावे हेच कळेना.

पाच मिनिटांनी सदूभटजी उपरण्यांनी डोळे पुसत बोलू लागले, 'गोदूताई, सकाळपासून राघूअण्णांकडे रीघ लागली होती. चाळकऱ्यांची हो माझं सांत्वन करायला. पण डोळ्यात एक टिपूससुद्धा आलं नाही. तुमच्या दरवाज्यात पाऊल टाकलं आणि अगदी गदगदून आलं. चला, देवांनी या सदूभटाचे सगळे पाश तोडून टाकले. आता सदूभट मरायला मोकळा झाला.'

'सदुभाऊ, असं बोलू नका हो. जगणं मरणं का कोणाच्या हातात असतं?'

'गोदूताई, कोणासाठी जगू मी? कोण आहे माझं या जगात? सर्वजण मी भिक्षूक म्हणून मला हिणवतात. केशवराव फायनलच्या परीक्षेत माझा जिल्ह्यात पहिला नंबर होता. पण वडिलांनी वेदशाळेत मला पिटाळलं. एक नव्हे दोन नव्हे चांगली बारा वर्षे अध्ययन केलं. काय फळ मिळालं मला? असलं दळभद्री जगणं? माझी पोर खरोखर नक्षत्रासारखी होती.'

सदूभटजींचं बोलणं आईला ऐकवेना. ती म्हणाली, 'सदूभाऊ बसा, मी चहा-फराळाचं घेऊन येते. सकाळपासून तुमच्यापोटात काही गेलं नसेल.'

'गोदूताई, क्षणभर बसा. किती दिवस सांगावं सांगावं म्हणत होतो पण ओठातच शब्द जिरत. गोदूताई, माझी पोर कितीही हुशार देखणी असली तरी एका फाटक्या भिक्षुकाची मुलगी सून म्हणून तुम्ही कराल अशी कल्पना करण्याएवढा मी काही दुधखुळा नव्हतो. पण माझं एक स्वप्न होतं. बाबल जरी नाही तरी बाबलसारखा राजबिंडा पोरगा मला जावई म्हणून मिळावा. गोदूताई, गरीबांनी स्वप्नसुद्धा रंगवायची नाहीत का? आता कसली स्वप्नं आणि कसला जावई? पोरीनी माझी सगळी स्वप्नं आपल्याबरोबर तळागाळात नेली. सुटली बिचारी. जाईल एखाद्या चांगल्या घरांत पुढच्या जन्मी. पोरींनी कसला कसला म्हणून हट्ट धरला नाही. गेल्या वैशाखाला पावसाळ्याची बेगमी करायला कोकणात गेलो होतो. मुंबईला येताना माझ्याबरोबर एस. टी. च्या तिठ्यापर्यंत आली. बस आल्यावर पुटपुटली बाबा, आम्हाला पातळं घेऊन तीन वर्ष झाली. आता अगदी पोतेरी झाली आहेत. गणपतीला वठारातल्या घरात जाताना अगदी जीवावर येतं. कशीबशी समजूत घालीत मी बसमध्ये चढलो. मुंबईला आल्यावर नाक्यावरच्या गोंधळेकरांकडून कधी नव्हे ती दोन अगदी उत्तम पातळं उधारीवर आणली. आणि नारळीपौर्णिमेनंतर नारायण घाड्याबरोबर घरी पाठवली. केशवराव पोरीच्या नशिबात पातळ नव्हतं. बाहेरच्या पडवीत दोघींची प्रेते ठेवली होती. माजघरातल्या बाजेवर ती पातळं होती. जिवंतपणी नाही तर स्मशानात नेताना त्यांना ती नेसवली होती.'

सदूभटजी बोल बोल बोलत होते. आई काका एवढच काय पण मी सुद्धा कान देऊन ऐकत होतो. विद्रूप अंगाचा हा भिक्षूक फणसासारखा रसाळ होता. त्याचं एक नवीन रूप मला जाणवलं.



Marathe Pratishthan

त्यानंतर अनेक पावसाळे निघून गेले. एका श्रीमंत कुटुंबातल्या सुशिक्षित मुलीबरोबर माझा विवाह झाला. आम्ही चाळ केव्हाच सोडली होती. पुण्यात माझी चार्टर्ड अकाऊंटंटची फर्म जोरात होती. परदेशी जाण्यासाठी पासपोर्ट मिळविण्याकरता आम्ही दोघं मुंबईला आलो होते. आईकडून, काकांकडून आणि कधीकधी माझ्याकडून तिच्या कानावर चाळीच्या गोष्टी येत. चाळ पाहण्याची तिची जबर इच्छा होती. काकानी सुचविल्याप्रमाणे आम्ही नाक्यावरच्या शंकराच्या देवळात पाया पडण्यासाठी गेलो. जवळचं पूजासाहित्य पुजाऱ्याच्या स्वाधीन केलं. रुद्राभिषेक करण्यासाठी पैसे दिले. पुजारी पोरगाच होता. मला ओळखणं शक्यच नव्हतं. देवळाच्या खांबाजवळ एक म्हातारा बसला होता. बोटभर दाढी, सुरकुतलेलं अंग. लटलटणारे हात. कानात भिकबाळी. माझं बोलणं ऐकून तो म्हातारा खांबाच्या आधारानी उठला. एकेक पाऊल टाकीत आमच्याकडे आला. हाताचे पंजे डोळ्यावर ठेवीत म्हणाला, 'गोदूताईचा बाबल ना रे तू?'

वैशाली डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहू लागली.

'हो, तुम्ही सदूभटजी ना?'

'हो रे बाबा. मरता येत नाही म्हणून जगतोय. गोदूताई गेल्या आषाढात पुण्यात गेली असे कानावर आले. दोन दिवस अन्न गेले नाही. मला कळवले असते तर बेस झाले असते. किती वाळलास रे? पैशाच्या पाठी फार लागू नकोस.'

मला सदूभटजींच्या पाया पडावं असं वाटलं होतं पण वैशाली सुधारक. ती थोडीच ऐकणार? माझी चलबिचल पाहून सदूभटजीच म्हणाले 'बाबल, मी तुम्हाला आशीर्वाद दिले तर चालतील?'

वैशाली चटकन म्हणाली, 'हे काय आजोबा तुमचा तो अधिकारच आहे.'

माझे अंदाज खोटे ठरले. वैशालीबरोबर मी सदूभटजीला वाकून नमस्कार केला. सदूभटजींनी संस्कृत भाषेत खणखणीत शब्दात आशीर्वाद दिले.

'हे बघ मुली, तू रागावणार नसलीस तर मी एक गोष्ट देणार आहे.'

सदू भटजींनी त्यांच्या पुराण्या रिवाजाप्रमाणे कंडोसरीचा रुपया काढून वैशालीच्या हातावर ठेवला आणि म्हणाले -

'मुली हे नाणं फक्त एक रुपयाचं आहे. पण माझ्या आयुष्याची पुण्याई त्याच्याबरोबर आहे. नीट दागिन्यांच्या पेटीत ठेव. तुला आयुष्यात काहीही कमी पडणार नाही. माझ्यासारख्या फाटक्या भिक्षुकाचं अंतरंग तू ओळखलंस. तू खरोखरच श्रीमंत आहेस. अशीच बाळ तू आयुष्यभर श्रीमंत राहशील. जावईबापू आमच्या मुलीला त्रास देऊ नका. लक्ष्मी आहे ती.'

देवळाच्या पायऱ्या उतरताना वैशाली हळूच म्हणाली 'कोण हे सदूभटजी? आईंना ते गोदूताई म्हणत होते. तुमचे मामा तर नाही ना?'

'अग ते एक पुराण आहे. घरी गेल्यावर तुला सगळं काही सांगेन.'

वैशालीला घेऊन मी भराभर पावलं उचलीत होतो. उगीचच भास झाला. सदूभटजी हातवारे करून म्हणताहेत 'जावईबापू जरा सावकाश. आता तुम्ही एकटे नाहीत वाऱ्यासारखे पळायला.'

***

---

# ।। गुरु ।।

**- सौ. माधवी कमलाकर जाईल** (पृ.७५७), पुणे

त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बन्धुः सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वम् मम देव देव ।।

माणूस जेव्हा जन्माला येतो, तेव्हा त्याचा पहिला गुरु माताच असते. आई सारखे दैवत त्याला इतर कोणातही दिसत नाही. आईचे बोट धरून चालू लागतो. आईच्या उबेत वाढत असतो. आई जे सांगेल त्यावर त्याची श्रद्धा व पूर्ण विश्वास असतो.

आपल्यासारख्या सामान्य माणसाला गुरु मिळणंच फार कठिण आहे. त्याच्यामध्ये गुरुसाठी व्याकूळता असावी लागते, त्यासाठी त्याला खूप कष्ट घ्यावे लागतात. योग्य गुरु मिळणे पण फार अवघड असते.

माणसाला मोठे झाल्यावर त्याला परमेश्वरापर्यंत पोचण्यासाठी गुरुची आवश्यकता असते. आणि असा गुरु सहजासहजी मिळत नाही. संत नामदेवांनी नैवेद्य खाण्यासाठी पांडुरंगाला परोपरीने आळविले आणि तो नैवेद्य खाण्यास भाग पाडले. ते परमेश्वर चिंतनात इतके रंगून जात होते. तरीसुद्धा त्यांना गुरुची आवश्यकता होती. त्यांना मुक्ताबाई म्हणाल्या होत्या की तुम्ही अजून कच्चे मडके आहात. म्हणजे तुम्हाला गुरुची आवश्यकता आहे. त्यानंतर त्यांना गुरु भेटला.

अर्जुनाला कृष्णासारखा गुरु सखा भेटला आणि त्यांनी अर्जुनाला जो उपदेश केला तो अर्जुनही तसाच योग्य शिष्य होता. तो ज्ञानी होता आपल्या सख्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता. त्याला केलेला उपदेश सर्वसामान्य माणसांसाठी व्यासांनी लिहून ठेवला. ती गीता आपण गुरूकडून समजावून घेतली तर आपल्याला संसाररूपी सागर तरून जाण्यासाठी त्याचा नक्कीच चांगला उपयोग होईल.

ही गीता सामान्य माणसांना कळावी म्हणून ज्ञानदेवांनी ती ज्ञानेश्वरीच्या रूपाने आपल्यापुढे ठेवली. ती जर आपण आयुष्याच्या सुरवातीस समजून घेण्याचा प्रयत्न केला तर आपण या जन्मी चांगले कर्म करून पुढील आयुष्याची चांगली शिदोरी बांधू शकू. त्यासाठी आपल्याला आपला ज्ञानदीप प्रज्वलित करायला हवा.

या जगात दिव्य ज्ञानासारखे उदात्त आणि शुद्ध असे दुसरे काहीही नाही आणि ज्याला हे ज्ञान प्राप्त झाले तो योग्य समयी आत्मस्वरूपाचा अनुभव घेतो. हा अनुभव घेण्यासाठी आपण गुरूचे बोट धरून जाऊ तेव्हाच जीवनाचा खरा मार्ग सापडेल.

***



Marathe Pratishthan

## हितगुजमार्फत विवाह सहाय्य

मराठे कुटुंबियांच्या लग्नाच्या मुली आणि मुलगे यांना अनुरूप जोडीदार मिळवण्यात कुलबांधव एकमेकांना मोलाची मदत करू शकतात. कुलबांधवांच्या नात्यांतील अथवा परिचयांतील स्थळाची विश्वासार्हता अर्थातच जास्त वाटेल. हितगुजच्या माध्यमांतून असे सहकार्य उपलब्ध करायचे आहे.

वाचकांनी त्यांच्या अथवा त्यांच्या परिचयांतील लग्नाच्या मुली व मुलगे यांची माहिती (जन्मतारीख अथवा वय, शिक्षण, उंची, वर्ण, पत्रिका हवी की नको, मंगळ आहे की नाही, रक्तगट, जोडीदाराविषयी अपेक्षा, संपर्क पत्ता व फोन नंबर) हितगुजमध्ये प्रसिद्धीसाठी **हितगुज (विवाह सहाय्य विभाग) असे पाकिटावर लिहून** खालील पत्यावर पाठवावी.

**ल. शं. मराठे, संपादक, हितगुज**

अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१

नाव, पत्ता छापायचे नसल्यास तसे स्पष्ट कळवावे म्हणजे नावाऐवजी सांकेतिक क्रमांक देऊन तो छापला जाईल व अशा स्थळांबाबत हितगुजकडे येणारी पत्रे संबंधितांकडे पाठवण्यात येतील.

## या अंकात

१. **अध्यक्षांचे आवाहन** ........................................ पृ.१
२. **डॉक्टरांशी हितगुज-कर्करोग आणि ॲनेस्थेशियाबाबत** ... पृ.५
३. **दाद बोरिवलीची-विभागीय मेळाव्याचा वृत्तांत** ........... पृ.४
४. **२०व्या वर्धापनदिन समारंभाचा वृत्तांत: २६.१.९९** ...... पृ.८
५. **चिंता नको, चिंतन हवे** .................................. पृ.१०
वामन गणेश, नेरूळ, नवी मुंबई.
६. **नागपूरस्थित मराठे मंडळींचे मकर संक्रमण संमेलन** ....पृ.१०
७. **विलंब:आपल्या प्रगतीचा शत्रु** ............................पृ.११
कै. श्रीधर परशुराम ऊर्फ बापूसाहेब मराठे, पुणे.
८. **पदर** .........................................................पृ.१२
मीनाक्षी अंकलीकर, शीव
९. **...एकच पक्ष नाही पुरणार** ............................ पृ.१२
सारिका भास्कर, वाडा
१०. **सदूभटजी** ................................................. पृ.१३
विनायक केशव, वरळी, मुंबई
११. **॥ गुरु ॥** ................................................. पृ.१५
सौ. माधवी कमलाकर जाईल, पुणे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३,४), **एकमेकां साह्य करू** (पृ.२,१०), **वाचनीय** (पृ.५), **खुषीपत्रे** (पृ.६), **प्रतिसाद** (पृ.१२), **अनुकरणीय** (पृ.१३) आणि **हसरे हितगुज** (पृ.१४) ही नेहमीची सदरे.

**बुक पोस्ट**

**प्रति**

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan